
सोमवार, १३ जून २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक ३२६
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## आत्मनिर्भर भारत : देशातच तयार होणार लढाऊ विमाने



**नवी दिल्ली** : वायू सेना लवकरच भारतीय बनावटीचे लढाऊ विमाने बनवणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणलेल्या आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत हा प्रकल्प राबवला जात असून दीड लाख कोटी रुपयांच्या निधीमध्ये भारत तब्बल ११४ लढाऊ विमाने बनवणार आहे. त्यापैकी ९६ लढाऊ विमाने भारतात बनवली जाणार आहेत. विदेशातून खरेदी करा आणि भारतात बनवा या संकल्पनेतून भारतीय वायू सेनेने हा प्रकल्प राबवला आहे. यामध्ये भारतीय कंपन्या परदेशी विक्रेत्यासोबत करार करता येणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी भारतीय वायू सेनेने विदेशी ग्राहकांसोबत करार केला असून भारतात प्रकल्प राबवण्याबाबत त्यांनी चर्चा केली असल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. या योजनेनुसार काही विमाने देशात बनवली जाणार असून काही आयात केली जाणार आहेत.

### अंतरंग
संजय राऊतांना सत्तेचा माज आलाय -खासदार बोंडे/२
एमआयडीसी प्रकल्पाविरोधात पेणच्या शेतकऱ्यांचे आंदोलन/५
हॉकीत भारताचा बेल्जियमवर रोमहर्षक विजय/८

# मुख्यमंत्री ठाकरेंनी राजीनामा द्यावा

## राज्यसभा निवडणुकीनंतर ना. नारायण राणे आक्रमक



**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी भाजप आणि महाविकास आघाडीत झालेल्या अटीतटीच्या लढतीत भाजपच्या धनंजय महाडिक यांनी बाजी मारत शिवसेनेच्या संजय पवार यांना पराभवाची धूळ चारली. या पार्श्वभूमीवर भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. ते रविवारी (दि. १२) सिंधुदुर्गमध्ये बोलत होते.

राज्यसभेवर निवडून आलेल्या भाजप उमेदवारांचे अभिनंदन करीत सिंधुदुर्ग जिल्हा भाजपकडून जल्लोष करण्यात आला. या वेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांची उपस्थिती होती.

'शिवसेना सांगत होती की महाविकास आघाडी तिन्ही जागा जिंकणार, पण शेवटी काय झाले? संजय राऊत तर काठावर पास झाले. त्यांना महाविकास आघाडीची मते मिळायला हवी होती. तेवढीही मते त्यांना मिळली नाहीत. शिवसेनेची स्वतःची मते त्यांच्या उमेदवाराला मिळालेली नाहीत. महाविकास आघाडीचे आठ ते नऊ आमदार फुटले आहेत. याचाच अर्थ सरकार अल्पमतात आले आहे. बहुमतासाठी १४५ आमदारांचे पाठबळ लागते. तुमच्याकडे तेही नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. नैतिकतेचे भान असेल तर राजीमाना द्या आणि बाजुला व्हा,' अशी टीका करीत ना. नारायण राणेंनी मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

आतापर्यंतच्या इतिहासात मुख्यमंत्र्यांनी जी भाषा वापरली नाही त्या भाषेत उद्धव ठाकरे बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करीत होते. आम्ही वाघ आहोत, अमूक आहोत असे म्हणत होते. जी भाषा वापरायला नको होती ती भाषा वापरल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची नाचक्की आणि बेअब्रुही झाली, अशी खोचक टीका ना. राणे यांनी केली.

### शरद पवारांकडून काहीतरी शिका!

लोकांना आपलेसे करण्यात त्यांना यश आले, असे म्हणत राज्यसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी भाजप नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले होते. यावरून ना. नारायण राणे यांनी शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांना शालजोडीतील लगावली आहे. 'मी संजय राऊत यांना किंमत देत नाही, त्यांनी शरद पवारांकडून काहीतरी शिकावे,' असे ना. राणे यांनी या वेळी म्हटले.

# खारघरमध्ये रक्तदान, आरोग्य शिबिराला प्रतिसाद

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. १२) खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरास लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अटल फाऊंडेशन, रोटरी क्लब ऑफ खारघर एक्झिक्युटिव्ह, रुधिर सेतू संस्था, एमजीएम हॉस्पिटल, टाटा हॉस्पिटल आणि खारघर भाजप यांच्या सहकार्याने झालेल्या शिबिरात ९२ जणांनी रक्तदान केले तसेच या वेळी अनेक नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी झाली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ब्रिजेश पटेल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

या शिबिराला भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, रामजी बेरा, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, माधुरी श्रीनिवास कोडूरू, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, मोना अडवाणी, बिना गोगरी, संध्या शारबिद्रे, साधना पवार, शोभा मिश्रा, अंजुबेन पटेल, निर्मला यादव, प्रिया दळवी, सुनंदा देसाई, विजया लक्ष्मी सरकार, वासुदेव पाटील, समीर कदम, संदीप रेड्डी, किरण पाटील, प्रभाकर बांगर, विलास आळेकर, गिरीश गुप्ता, राजेंद्र मांजरेकर, सूर्या दुडम, शुभ पाटील, नवनीत मारू, संतोष शर्मा, मुकेश गर्ग, सुमित सहाय, योगेंद्र कोत्यारि, रोहन शेट्टी, कृष्णा खडगी, अशोक जांगीड, विजय बागडे आदी उपस्थित होते. शिवाय अनामिका चप्पल आणि काजल कांबळे या मिसेस खारघर विजेत्या दोघींनीही या शिबिराला सदिच्छा भेट दिली.

राष्ट्रीय हित जोपासत सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने जास्तीत जास्त जणांनी रक्तदान करण्याचे आवाहन अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केले होते. त्यास प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले. या वेळी पटेल म्हणाले की, रक्तदान ही काळाची गरज आहे. एका रक्तदात्यामुळे आपण तिघांचे प्राण वाचवू शकतो ही कल्पनाच अतिशय सुखावह ठरते.

## शिवसेनेविरोधात भूमिका घेत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी 'दिबां'च्या नावाचा काँग्रेसकडून ठराव

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाच्या वतीने रविवारी (दि. १२) राज्यस्तरीय मंथन शिबिराचे आयोजन उलवे नोडमध्ये करण्यात आले होते. या वेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या शिबिरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, असा ठराव करण्यात आला.

याआधी महाविकास आघाडीतील शिवसेनेच्या आग्रहामुळे नवी मुंबई विमानतळाला स्व. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा ठराव सिडकोने करून तो राज्य सरकारकडे पाठविला होता, मात्र काँग्रेसने आता वेगळी भूमिका घेतलीय.

नवी मुंबई विमानतळाला भूमिपुत्रांचे नेते 'दिबां'चेच नाव देण्यात यावे यासाठी सर्वपक्षीय कृती समितीने पुढाकार घेतला असून वेळोवेळी आंदोलने केलेली आहेत. त्यास भूमिपुत्रांचा उदंड प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले आहे. त्यामुळेच स्थानिकांच्या भावना लक्षात घेत काँग्रेसने शिवसेनेविरोधात जात सूर बदलल्याचे बोलले जात आहे.

### राज्यात कोरोना वाढतोय! नव्या २९४६ रुग्णांची नोंद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मागील काही दिवसांपासून कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून रविवारी (दि. १२) तब्बल २९४६ नवे कोरोनाबाधित आढळून आले आहेत. यातील १८०३ रुग्ण मुंबईतील असल्याने मुंबईकरांची चिंता वाढली आहे.

राज्यात रविवारी १४३२ रुग्ण कोरोनातून बरे झाले आहेत, तर कोरोनामुळे झालेल्या मृत्यूंची संख्या दोन आहे. दरम्यान, राज्यात कोरोना रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ७.९२ टक्के इतके असून मृत्यूदर १.८६ टक्के आहे.

### निवडक

**तीन दहशतवाद्यांना पुलवामामध्ये कंठस्नान**

**श्रीनगर** : दक्षिण काश्मिरच्या पुलवामामध्ये लष्कर, निमलष्करी दल आणि जम्मू-काश्मिर पोलीस यांनी संयुक्तरित्या कारवाई करीत लष्कर-ए-तोयबाच्या तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. मारले गेलेले तीनही दहशतवादी हे पुलवामातील रहिवासी होते. जुनैद शीरगोजरी, फाझिल भट आणि इरफान मलिक अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून दोन एके-४७ रायफल आणि काही गोळ्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत.

**काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी रुग्णालयात दाखल**


**नवी दिल्ली** : काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांना रविवारी (दि. १२) कोविडसंबंधित त्रासामुळे गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रवक्ते रणदिपसिंह सुरजेवाला यांनी दिली. सोनिया यांना काही दिवसांपूर्वी कोरोनाची लागण झाली होती.

## श्रीवर्धनमध्ये तब्बल ३६ तास वीजपुरवठा खंडित

### स्थानिकांसह पर्यटकही त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे श्रीवर्धनसह हरिहरेश्वरमधील वीजपुरवठा तब्बल ३६ तास खंडित झाला होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकांचे हाल झाले.



श्रीवर्धन शहर व परिसरात शुक्रवारी रात्री विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. या वेळी पाभरे वीज उपकेंद्रातून श्रीवर्धनकडे येणाऱ्या मुख्य विद्युत वाहिनीवर विजेचे झोत पडल्यामुळे बिघाड झाला. अनेक ठिकाणी इन्सुलेटर फुटल्याने वीज कर्मचाऱ्यांना प्रत्येक पोलवर चढून तपासणी करावी लागत होती. शनिवारी रात्री २च्या सुमारास वीजपुरवठा सुरू झाला, मात्र २० ते २५ मिनिटांनंतर पुन्हा एकदा पाऊस सुरू झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला.

शनिवार, रविवार या सुटीच्या दिवशी श्रीवर्धन व हरिहरेश्वर परिसरात पर्यटकांची संख्या मोठी होती. बहुतांश हॉटेल मालकांकडे इन्व्हर्टरची सुविधा उपलब्ध आहे, मात्र १२ ते १५ तासांपेक्षा जास्त काळ इन्व्हर्टर बॅकअप देऊ शकत नसल्यामुळे हॉटेल अंधारात बुडून गेली. त्यामुळे येथे आलेल्या पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली.

महावितरणकडून महिन्यातून चार वेळा देखभाल-दुरुस्तीसाठी वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. तरीही त्यानंतर वीजपुरवठा कसा काय खंडित होतो, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

श्रीवर्धनचे उपकार्यकारी अभियंता महेंद्र वाकपैंजण यांची रत्नागिरी येथे बदली झाल्यानंतर हे पद रिक्त आहे. रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघातच महावितरणची ही अवस्था असून याकडे त्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## खासदार धनंजय महाडिकांचे कोल्हापुरात जंगी स्वागत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पराभवांच्या मालिकेवर मात करीत भाजप नेते धनंजय महाडिक यांनी अखेर विजयाचा झेंडा रोवला. राज्यसभेवर निवडून गेलेले नवनिर्वाचित खासदार महाडिक यांचे रविवारी (दि. १२) कोल्हापूरकरांच्या वतीने जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला. डीजेचा दणदणाट, फुलांच्या पायघड्या, गुलालाची उधळण आणि कार्यकर्त्यांची गर्दी असे भारलेले वातावरण या वेळी होते.




राज्यसभा निवडणुकीच्या भाजपच्या तीन जागा निवडून आणण्याचा अशक्यप्राय प्रयोग यशस्वी करीत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीला जोरदार दणका दिला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, डॉ. अनिल बोंडे यांना सहज निवडून आणत तिसरे उमेदवार धनंजय महाडिक यांचा विजय फडणवीसांनी अक्षरशः खेचून आणला. या विजयानंतर महाडिकांना आभाळ ठेंगणे झाले आहे, कारण गेल्या चार-पाच वर्षांत पराभवाने महाडिकांची पाठ सोडली नव्हती, पण फडणवीसांच्या चाणाक्ष खेळीने अपक्षांना हाताशी धरून महाडिकांच्या कपाळी विजयाचा टिळा लागला.

मुंबईतील प्रदेश कार्यालयात भाजपच्या तीनही नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार समारंभ शनिवारी मोठ्या हर्षोल्लासात झाला. हा सत्कार समारंभ आटपून खासदार महाडिक कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाले. वाटेत पुण्यात थांबून ज्यांच्यामुळे त्यांच्या कपाळी विजयाचा टिळा लागला त्या आमदार लक्ष्मण जगताप आणि मुक्ता टिळक यांची रुग्णालयात जाऊन खासदार महाडिकांनी भेट घेतली. त्यांना धन्यवाद दिले तसेच त्यांचे आशीर्वादही घेतले.

यानंतर रविवारी दुपारी खासदार धनंजय महाडिक यांचे कोल्हापुरात आगमन झाले. हजारो कार्यकर्ते त्यांच्या स्वागताला हजर होते. या वेळी खासदार महाडिक यांचा खास कोल्हापुरी फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

> **भाजपने माझ्यासारख्या सामान्य युवकाला संधी दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे आभार मानतो. पक्षाचे काम जोमात करून मला दिलेल्या संधीचे सोने करेन.**
> **-धनंजय महाडिक, खासदार**

### खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

## टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषने दुहेरीत जिंकले सुवर्णपदक



**पंचकुला : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये मुलींच्या दुहेरीत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष आणि दिया चितळे या जोडीने हरियाणाच्या प्रिथोकी चक्रवर्ती आणि सुहाना सैनी यांना अंतिम सामन्यात हरवून सुवर्णपदक पटकाविले. त्यांनी १४-१२, ११-०९, ११-६ असे तीन सेट जिंकून ही 'सुवर्ण' कामगिरी केली.

पनवेल तालुक्यातील खारघर येथे राहणाऱ्या स्वस्तिकाने लहानपणापासून टेबल टेनिस खेळात आपली आवड व नैपुण्य दाखविले आहे. ती जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देश-विदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे.

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत पहिल्या सेटपासूनच स्वस्तिका आणि दियाने आक्रमक खेळ करीत हरियाणाच्या खेळाडूंना बॅकफूटवर ढकलले. पहिल्या सेटमध्ये महाराष्ट्राचे १४, तर हरियाणाचे १२ गुण होते. दुसरा सेटही स्वस्तिका आणि दियाने ११-०९ असा जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये हरियाणाच्या खेळाडूंनी थोडाफार प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, परंतु स्वस्तिका आणि दियाने त्यांचे संरक्षण भेदून काढत तिसरा सेट ११-६ असा जिंकला आणि सुवर्णपदकाला गवसणी घातली. याबद्दल या दोघींचेही अभिनंदन होत आहे.



### तिथीनुसार शिवराज्याभिषेक उत्साहात

**महाड : शिवकालीन पारंपरिक वेशभूषेत किल्ले रायगडावर आलेल्या शिवप्रेमींच्या उपस्थितीत रविवारी तिथीनुसार शिवराज्याभिषेक मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता.** (छाया : सुधीर नाझरे) **वृत्त पान ५ वर..**



# संजय राऊतांनी आचारसंहितेचा भंग केला

## किरीट सोमय्यांचा आरोप; निवडणूक आयोगाने दखल घेण्याची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेचे प्रवक्ता, खासदार संजय राऊत यांनी निवडणुकीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.

राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि भाजपाचे प्रत्येकी तीन उमेदवार निवडून आले. या निवडणुकीत शिवसेनेचे संजय पवार आणि भाजपाचे धनंजय महाडिक यांच्यातील लढत प्रतिष्ठेची समजली जात होती. मात्र या लढतीमध्ये संजय पवार



यांचा पराभव झाला. या पराभवानंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी काही आमदारांची नावे घेत त्यांनी आम्हाला मते दिली नाही, असा चक्क आरोप केला. राऊतांनी आमदारांची नावे जाहीर करण्यावर भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांनी आक्षेप घेतला असून राऊतांनी निवडणुकीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. तसेच निवडणूक आयोगाने याबद्दल योग्य कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी भाजपाला मतदान करणारे अपक्ष तसेच छोट्या पक्षांच्या सहा आमदारांची नावे उघड केली आहेत. ही कृती म्हणजे गोपनीयतेचा भंग नव्हे का? मी निवडणूक आयोगाला विनंती करतो की, निवडणूक आचारसंहितेचा भंग करण्याच्या या प्रकरणाची योग्य दखल घ्यावी, अशी मागणी किरीट सोमय्या यांनी ट्विटच्या माध्यमातून केली आहे.

# संजय राऊतांना सत्तेचा माज आलाय!

## भाजप नेते अनिल बोंडे यांचा घणाघात

**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जनता महाविकास आघाडीला वैतागली आहे. एवढचे नाही तर महाविकास आघाडीतील आणि अपक्ष आमदारही वैतागले असल्याचा आरोप भाजप नेते अनिल बोंडे यांनी केला आहे. संजय राऊत यांना सत्तेचा माज आला असून त्यांनी अपक्ष आमदारांची बदनामी करण्याचा गाढवपणा केल्याची टीका बोंडे यांनी केली आहे. राज्यसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर बोंडे हे नागपूरात दाखल झाले होते. नागपूर विमानतळावर त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



संजय राऊत यांच्याकडेही यंत्रणा आहे. संजय राऊत बदलेच्या भावनेने प्रत्येक वेळेस चूका करतात. राऊत द्वेषाने पेटलेले आहेत. सत्ता लोकांसाठी असते. लोकांच्या भल्यासाठी असते. मात्र, संजय राऊत यांना सत्तेचा माज आला असल्याची टीका बोंडे यांनी केली आहे. संजय राऊत आणि शिवसेनेने अपक्ष आमदारांचाही अपमान केला आहे. अपक्ष आमदार घोडेबाजारामध्ये खपले, किंमत घेतली असा आरोप करून बदनामी करण्याचा गाढवपणा संजय राऊत यांनी केला असल्याचेही बोंडे म्हणाले.

# नवी मुंबईत कोविड रुग्णांचा आकडा एक हजारच्या पार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोविडच्या रुग्णांची आकडेवारी दिवसेंदिवस वाढत असून रविवारी (दि. १२) नवी मुंबई शहरात आढळलेल्या २३७ नव्या रुग्णांमुळे उपचाराधीन कोविड रुग्णांच्या आकडेवारीने एक हजाराचा आकडा पार केला आहे. सध्या शहरात विविध ठिकाणी तब्बल एक हजार १७३ रुग्ण उपचार घेत आहेत. मागील दोन दिवसांत नवी मुंबईत तब्बल ४६३ रुग्णांची नोंद झाली आहे.

कोविडच्या तीनही लाटांचा सामना केल्यानंतर आता शहरात कोविडच्या नव्या रुग्णांची नोंद उच्चांकी आकड्यावर जात आहे. मागील आठवडाभरात शहरात रुग्णांची भरमसाट वाढ झाली आहे. या मागे महापालिकेच्या आरोग्य विभागाने वाढलेल्या चाचण्यांचे कारणही पुढे केले जात आहे. नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी रुग्ण वाढीस लागल्यानंतर आरोग्य विभागाला कोविड चाचण्यांची संख्या वाढवण्याच्या सूचना केल्या आहेत. बांगर यांच्या सूचनेमुळे आरोग्य विभागातर्फे पुन्हा नागरी आरोग्य केंद्रे, रुग्णालये आणि रेल्वे स्थानकांवर कोविड चाचण्या करण्यास सुरुवात झाली आहे.

तीन दिवसांत आरोग्य विभागातर्फे तब्बल १२ हजारपेक्षा जास्त चाचण्या केल्या आहेत. एवढ्या चाचण्या केल्यानंतर पाचशेपेक्षा जास्त रुग्णांची नोंद झाली आहे. शहरात कोविड रुग्णांची नव्याने नोंद होत असली तरी बहुतांश रुग्ण हे घरीच उपचार घेऊन बरे होत आहेत. सर्व परिस्थिती हातात असल्याचे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात येत आहे.

# मुंबईच्या रेल्वे प्रवाशांसाठी रेल्वेमंत्र्यांची घेतली भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्यात रेल्वे सेवा सुरळीत सुरू राहावी, दुरूस्तीची कामे वेळोवेळी पूर्ण व्हावीत, लोकल गाड्यांची संख्या व वेळा प्रवाशांच्या सोयीनुसार असाव्यात आणि एसी लोकलची संख्या वाढवावी, एस्केलेटर्सची संख्या वाढवावी व नादुरूस्त एस्केलेटर्स दुरूस्त करावेत अशा अनेक रेल्वे प्रवाशांच्या मागण्यांसाठी भाजपच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष राज पुरोहित, मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये, आयटी व सोशल मीडिया इनचार्ज समीर गुरव, रेल्वे बोर्डाचे सदस्य जय नागवानी व प्रोटोकॉल सदस्य संतोष पांडेय उपस्थित होते.



# राज्यसभा निवडणुकीत आघाडीचे नियोजन चुकले : राज्यमंत्री बच्चू कडू

**अमरावती : प्रतिनिधी**



राज्यसभा निवडणुकीत आघाडी सरकारचे नियोजन पुर्णपणे चुकीचे झाले असल्याचे मत राज्यमंत्री बच्चू कडू यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.

निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले होते. फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना विविध मार्गाने अपक्ष आमदारांना आपल्या बाजूने वळवण्यात यश आले असल्याचे पवार म्हणाले होते. त्यांच्या याच वक्तव्यावर कडू यांनी प्रतिक्रिया दिली. आम्हाला पाठिंबा देणाऱ्या अपक्षांना आपल्या बाजूने वळवण्यात भाजपला यश आले. हा चमत्कार मान्य करावा लागेलच, असे बच्चू कडू म्हणाले.

दरम्यान, राज्यसभा निवडणूक नुकतीच झाली. यात भाजपला चांगले यश आले आहे. भाजपच्या तिन्ही जागा निवडून आल्या. माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांचे हे कौशल्य असल्याचे म्हटले जात आहे, तर दुसरीकडे या निकालामुळे आघाडीत आलबेल नसल्याचे चित्र आहे.



**मुरुड : पावसामुळे मच्छीमारांनी बोटी किनारी आणून ठेवल्या असून जोरदार पाऊस येईल या शक्यतेने त्यावर छप्पर घालण्यात आले आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# उरणमध्ये फणसाची मोठी आवक

**उरण : वार्ताहर**

वटपौर्णिमा मंगळवारी (दि. १४) असल्याने दरवर्षीप्रमाणे फणसाला मागणी वाढली आहे. उरण शहरात ठिकठिकाणी मोक्याच्या जागी फणस विकावयास आले असून फणस खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरवर्षी पावसाळ्याच्या काही दिवस अगोदर बाजारात फणसाची मोठ्या प्रमाणात आवक होते. काही ठिकाणी किलोनुसार ४० रुपये किलो तर गरे २०० रुपये किलो अशा दराने विक्री केली जात होती. तर काही ठिकाणी आकारानुसार विक्री होत आहे. मात्र या फणसाला इतर दिवसांपेक्षा वटपौर्णिमेला मागणी वाढत असल्याने उरण बाजारात रॉयल हॉटेल समोर, पालवी हॉस्पिटलजवळ फणस विकावयास आले होते.

फणस पिकण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागत असल्यामुळे फणस विकत घेऊन घरी नेण्याला ग्राहक पसंती देत असल्याची माहिती दिनेश ठाकूर या विक्रेत्याने दिली. तर मोठा फणस खरेदी करण्यापेक्षा रसाळ गरे खरेदीलादेखील ग्राहक पसंती देत आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार अनेक विक्रेते फणसातील गरे काढून त्याची विक्री करत आहेत.



> **आम्ही कर्नाटक येथून फणस आणतो, त्यामुळे फणस हा कापा असतात. गेली २५ वर्षांपासून आम्ही फणस विकत आहोत. ४० रुपये किलो या दराने आम्ही फणस विकत आहोत.**
> **–दिनेश ठाकूर, विक्रेता**

> **कापा किंवा बरका फणस समजून येत नाही. त्यामुळे आम्ही गरे विकत घेणे पसंत करतो. विक्रेता कापा सांगतात व विक्री करतात. वट पौर्णिमेला फणसाच्या गऱ्यांना फारच महत्त्व असते.**
> **–संगिता पवार, ग्राहक**

# २०१९च्या बदलानंतरची डोक्यातील मस्ती उतरली

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची 'मविआ'वर टीका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

या जिल्ह्यामध्ये राजकीय चढ उतार नेहमी होत राहिले आहेत. ते चढ उतार एक नैसर्गिक बाब आहे. ती मनुष्याच्या आणि समाजाच्या आयुष्यात येतात. पण २०१९च्या बदलानंतर असा काही मस्ती, अहंकार काही व्यक्तींच्या डोक्यात चढला. तो उतरविण्यासाठी काही तरी संतुलित होण्याची आवश्यकता होती, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीवर केला. कोल्हापूरमध्ये खासदार धनंजय महाडिक यांची विजय मिरवणूक काढण्यात आली होती. त्यावेळी पाटील प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

आता केवळ एक खासदार झाला नाही. धनंजय महाडिक या महाडिक घराण्यामागे एक प्रचंड मोठी ताकद आहे. ज्या ताकदीला राजकीय जोडची आवश्यकता होती, ती मिळाली आहे. ६३ वर्ष मला झाली. या ६३ वर्षांमध्ये सगळी वर्षे नाही पण गेली २० वर्ष वाढदिवस मी साजरा करतो, की ज्यात लोकोपयोगी कामे करतो. पहिला वाढदिवस असा झाला की त्या दिवशी मिळालेली गिफ्ट माझ्या आयुष्यात कधी विसरणार नाही. हो मी भावूक झालो होतो, त्याचे कारण गेल्या अडीच वर्षांपासून सरकार नसल्यामुळे जे सहन कराव लागले त्या सर्व सहन करण्यातून एक मनामध्ये भाव निर्माण झाला. या सर्वाचे परिमार्जन झाले आणि मला यातून आनंदाश्रू आवरता आले नसल्याचे पाटील म्हणाले.

आपण धनंजय महाडिकांना म्हटले, आणि देवेंद्र फडणवीसांना तर मी म्हणण्याची आवश्यकता नाही. त्यांनी आम्हाला म्हटले, की उतू नको मातू नको घेतला वसा सोडू नको. आणि म्हणून आमची अहंकाराची भाषा नाही. धनंजय महाडिक भारतीय जनता पक्षाचे, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकासाच्या पाऊलवाटेवर विकासाच्या हमरस्त्यावर चालतील. आणि या जिल्ह्यामध्ये भाजप पुन्हा एकदा वैभव प्राप्त करुन देईल. नजीकच्या काळात नगर परिषद, महानगर पालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका आहेत. सगळ्या निवडणुकांमध्ये या यशाचे प्रतिबिंब आपल्याला दिसेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.



# पावसाळी वस्तूंनी बाजारपेठा सजल्या

**उरण : वार्ताहर**

राज्यात मान्सूनचे आगमन झाले असल्याने उरण शहरात रेनकोट आणि रंगबेरंगी छत्र्या प्लास्टिक पत्रे, बॅग कव्हर, ताडपत्री खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू आहे. दोन वर्षांपासून लॉकडाऊनमुळे आर्थिक कचाट्यात सापडलेल्या कित्येक व्यावसायिकांनी आपली दुकाने गुंडाळली होती, मात्र आता पुन्हा बाजारपेठा सजल्या आहेत.

रेनकोट किंवा छत्री घेतल्याशिवाय नोकरदार वर्ग विद्यार्थी घराबाहेर पडू शकत नाहीत. त्यामुळे रेनकोट, छत्र्या, पावसाळी टोप्या ताडपत्रीच्या दुकानामध्ये गर्दी होत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा छत्री व रेन कोटचे दर १५ ते २० टक्क्यांनी वाढले आहे.

युवा वर्गात विविध रंगाच्या छत्र्याची क्रेझ असते. बाजारात प्रिंटेड, एक, दोन, तीन फोल्डिंग आणि सिल्व्हर, रेम्बो मल्टीकलर पारदर्शक अशा छत्री विविध प्रकारात उपलब्ध आहेत. दरम्यान लहान मुलांचे आकर्षण असलेले अनेक रेनकोट बाजारात उपलब्ध असून खरेदीसाठी गर्दी होत आहे.

> **मेटल, कापड यांच्या किमती वाढल्यामुळे पावसाळी साहित्याचे दर वाढले आहेत. मात्र आपल्याकडे पाऊस जास्त असल्याने खरेदीसाठी गर्दी होत आहे.**
> **–ताराचंद जैन, विक्रेता**



# सुधागडात फणसाची मोठी रेलचेल; दरही कमी


**सुधागड : रामप्रहर वृत्त**

यंदा फणसाचे उत्पादन भरघोस आले आहे. शिवाय कोरोनाचे सावट सरल्याने व कोरोनाचे निर्बंध नसल्याने जिल्ह्यात फणसाच्या किमती निम्म्याने उतरल्या आहेत. गेल्या वर्षी १५० रुपये किलोने मिळणारे फणस आता अवघे १०० ते ११० रुपये किलोने मिळत आहेत. परिणामी खवय्ये खुश आहेत.

वटपौर्णिमा एक दिवसांवर आली आहे. वटपौर्णिमेला फणसाला सर्वात जास्त मागणी असते. यंदा फणस स्वस्त मिळत असल्याने सुहासिनी महिला देखील आनंदी आहेत असे पालीतील लता माळी या गृहिणीने सांगितले. तर शरद निकुंभ म्हणाले की बाजारात मोठ्या प्रमाणात फणस उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे फणस खरेदीसाठी रेलचेल दिसत आहे. रायगड जिल्ह्यासह जिल्ह्यातील व शेजारील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फणस देखील येथे विक्रीला आले आहेत.



> **मागील वर्षी लॉकडाऊन होते. बाजारात काही प्रमाणात निर्बंधदेखील होते. परिणामी फणसाची आवक कमी होती. मागणी सुध्दा फार नव्हती त्यामुळे फणस महाग होते. मात्र यंदा आवक व मागणी अधिक आहे. कोरोनाचे सर्व निर्बंध हटविले असून फणसाचे उत्पादन देखील चांगले झाले असल्याने फणसाच्या किमती उतरल्या आहेत.**
> **–सुभाष ओसवाल–व्यापारी, पाली**


पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १३ जून २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**





# भाजप भटके विमुक्त आघाडीची बैठक

## पनवेलमध्ये नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रेरणेतून व आमदार नरेंद्र पवार आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप भटके विमुक्त आघाडीच्या संघटनात्मक नियुक्त्या झाल्या. पनवेलमधील भाजप मध्यवर्ती कार्यालयात शनिवारी (दि. ११) झालेल्या भाजप भटके विमुक्त आघाडीच्या बैठकीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भाजप भविआ महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक गोविंद गुंजाळकर, कोकण विभाग सहसंयोजक भास्कर यमगर, महिला आघाडी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, कोकण सहसंयोजिका उज्ज्वला गलांडे, जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे (उत्तर रायगड), जिल्हा अध्यक्ष शैलेश काते (दक्षिण रायगड) आणि जिल्हा महिला अध्यक्ष विद्या तामखडे (उत्तर रायगड) यांच्या सहकार्याने भटके विमुक्त आघाडीच्या संघटनात्मक बांधणीचा विस्तार करण्यात आला. संघटनेला बळकटी देण्यासाठी डॉ. पवनकुमार पवार आणि ज्ञानेश्वर चव्हाण यांची कोकण सहसंयोजक, तर मीनाक्षी गीते यांची पनवेल शहर मंडल सहसंयोजिका म्हणून निवड येऊन त्यांना



नियुक्तीपत्र देण्यात आले.

या बैठकीस भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस अमरीश मोकल, भविआचे पनवेल ग्रामीण संयोजक जयदत्त सानप, प्रेमला नारनवर, सुरेश नारनवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# उरणमध्ये भाजपची भव्य बाईक रॅली

**उरण : वार्ताहर**

मोदी सरकारने यशस्वी आठ वर्षे पूर्ण केल्यानिमित्ताने भव्य बाईक रॅलीचे आयोजन रविवारी (दि. १२) दास्तान फाटा शिवस्मारक येथे करण्यात आले होते. दरम्यान, या वेळी भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

उरणमध्ये रविवारी काढण्यात आलेल्या बाईक रॅलीची सुरुवात शिवस्मारकाजवळून झाली. पुढे रॅली दिघोडे, चिरनेर, दिघाटी, पिरकोन, कोप्रोली, खोपटा, भेंडखळ, टाऊनशिप कॉलनी, न्हावाशेवा पोलीस स्टेशन, करळ ब्रिज, उरण चारफाटा, ओएनजीसी रोड, अंबिका वाडी,



मोठे नागाव, घोसपाडा चिंबळ थळी, कुंभारवाडा, पुढे आमदार महेश बालदी संपर्क कार्यालय उरण येथे या रॅलीची सांगता करण्यात आली.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, नगरसेवक राजू ठाकूर, रायगड जिल्हा ओबीसी सेल अध्यक्ष चंद्रकांत घरत, उरण नगर परिषद उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण तालुका युवा मोर्चा अध्यक्ष शेखर पाटील, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, हितेश शाह, तेजस पाटील, जितेंद्र ठाकूर, रमेश पाटील, भूषण म्हात्रे, शैलेश गावंड, रमेश पाटील, सुरज ढवळे, मयूर पाटील, मिथुन पुरव, सुनील पाटील, राजेंद्र पाटील, रुपेंद्र ठाकूर, मिलिंद पाटील, प्रशांत ठाकूर आदी उपस्थित होते.

## नवीन पनवेलमध्ये कंपनीला आग; मोठे नुकसान



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील एका रूम फ्रेशनर बनविणाऱ्या कंपनीला लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले आहे.

नवीन पनवेल येथील प्लॉट नंबर ५२ वरील रूम फ्रेशनर बनविणाऱ्या कंपनीला आग लागली ताबडतोब अग्निशमन दलाला कळविण्यात आल्याने, त्यांनी पंधरा ते वीस मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळविले व पुढील अनर्थ टळला. नवीन पनवेल, सेक्टर १ एस येथील एचपी गॅसच्या पाठीमागील बाजूस असलेल्या एरोकेअर कंपनीला आग लागली. या आगीत रूम फ्रेशनर बनविण्यासाठी वापरण्यता येणाऱ्या ॲल्युमिनिअम, झाकणे, त्याचे बटण, पुठ्ठा जाळून खाक झाला. या आगीची माहिती नवीन पनवेल अग्निशमन दलाला देण्यात आली. त्यानंतर, नवीन पनवेल अग्निशमन दलाच्या दोन गाड्या, महापालिकेची एक व कळंबोलीची एक गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी या वेळी आत मध्ये असलेल्या दोन माणसांना बाहेर काढल्यामुळे पुढील अनर्थ टाळला आहे.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात रेडिऑलीजिस्टच्या नियुक्तीची मागणी

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी मशीनसाठी रेडिऑलीजिस्ट पद भरण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. रेडिऑलीजिस्टच नसल्याने उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना सोनोग्राफीसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे.

१२० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात २० खाटांचे ट्रॉमा सेंटर, १०० खाटांचे रुग्णालय



आहे. या व्यतिरिक्त शवागार, शवविच्छेदनगृह या रुग्णालयात असणार आहे. कोविडच्या तीन लाटांमध्ये या रुग्णालयाला कोविडचा दर्जा दिला गेला होता. कोविड नियंत्रणात आल्यावर पुन्हा एकदा विविध व्याधी जडलेले रुग्ण याठिकाणी उपचार घेत आहेत. डॉक्टर नसल्याने मशीन कार्यान्वित होत नाही. यामुळे विशेषत: गरोदर महिलांची गैरसोय होत आहे.

उपजिल्हा रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांमध्ये आदिवासी, कातकरी समाजाचे बांधव, ग्रामीण भागातील ग्रामस्थ, आर्थिक परिस्थिती बेताची असलेले नागरिक उपचार घेत असतात त्यामुळे शासनाच्या आरोग्य विभागाने याबाबत त्वरित उपाययोजना राबवून ही मशीन कार्यान्वित करण्याची गरज आहे.

> **उपजिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन कार्यान्वित आहे.ती चालविण्याकरिता रेडिओलॉजिस्ट नसल्याने सध्याच्या घडीला ती बंद अवस्थेत आहे.**
> **-डॉ. सचिन संकपाळ, प्रभारी अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय पनवेल**

# रेशन-आधार लिंक करताना अडचणी

### समस्या सोडविण्याची प्रशासनाकडे मागणी

**खारघर : प्रतिनिधी**

शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेण्यासाठी रेशनकार्डधारकांनी आधार क्रमांक सादर करणे आवश्यक आहे. यासाठीची डेडलाइन ३० जून ठेवण्यात आली आहे. तोपर्यंत आधार नोंदणी न केल्यास रेशन मिळण्यास अडचणी निर्माण होणार आहेत, मात्र रेशन कार्ड आणि आधार लिंक करण्यात तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने नोंदणीच्या संख्येवर त्याचा परीणाम होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या संबंधित खात्याकडून ही समस्या सोडविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.



कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊनच्या काळात गरिबांची परिस्थिती पाहता सरकारने मोफत रेशनची सुविधा सुरू केली होती. शासनाची ही सुविधा सप्टेंबर २०२२ पर्यंत सुरू राहणार आहे. आता रेशन कार्ड आणि आधार लिंक करण्याचा नियम सरकारने केला आहे. शासनामार्फत ३० जुन अंतिम मुदत देण्यात आली असली तरी आधार सिडिंगसाठी संकेतस्थळावरदेखील तांत्रिक अडचण निर्माण होत असल्याने बहुतांशी लाभार्थ्यांध्ये अद्याप सिडींग होऊ शकलेले नाही.

> **रेशनकार्ड वरील सर्व नावे आधार सिडींग झाल्यास लाभार्थ्यांना रेशन मिळणे सोपे जाणार आहे. याकरिता शासनाने आधार सिडींगचा निर्णय घेतला आहे. याकरिता शेवटची मुदत ३० जुन आहे. पनवेलमध्ये अडीच हजारांच्या जवळपास आधार सिडींग शिल्लक आहे. यामध्ये बहुतांशी नव्या आधारकार्ड धारकांचा समावेश आहे. संकेतस्थळावर तांत्रिक अडचण निर्माण होत असल्यानेदेखील आधार सिडींगच्या कामाला काही प्रमाणात उशीर होत आहे.**
> **-विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**

आधार सिडींगसाठी यापूर्वी याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२२ होती. मात्र शेवटच्या दिवशी ती वाढवून ३० जून करण्यात आली. जर तुम्ही आधार आणि रेशन कार्ड लिंक केले नसेल तर लवकर करा, असे न केल्यास रेशन सुविधा बंद होऊ शकते.

पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या पुढाकाराने विशेष शिबिरे राबवून कातकरी समाज, ट्रान्स जेंडर, रेड लाईटमधील महिलांकरिता नव्याने आधारकार्ड देऊ करण्यात आले आहेत. आधार नोंदणी शिल्लक असलेल्या लाभार्थ्यांमध्ये या नवोदित लाभार्थ्यांचा प्रमाण जास्त आहे.

| | |
|---|---|
| रेशनकार्डधारक | १०९१४७ |
| अंत्योदय | ६०९४ |
| प्राधान्य कुटुंब | ६२३६० |
| एपीएल कुटुंब | ४०६९३ |

पनवेल तालुक्यात जवळपास २५०० रेशनकार्ड धारकांचे आधार नोंदणी शिल्लक आहे. तांत्रिक अडचणीमुळेदेखील आधार नोंदणीसाठी विलंब होत आहे.

रेशन कार्ड आधारशी लिंक करण्यासाठी काही डॉक्युमेंट आधार कार्ड कॉपी, रेशन कार्ड कॉपी आणि रेशन कार्डधारकाचा पासपोर्ट साइज फोटो रेशन कार्ड केंद्रात जमा करावा लागेल. त्याशिवाय रेशन कार्ड केंद्रात तुमचं आधार कार्ड बायोमेट्रिक डेटा वेरिफिकेशनही होऊ शकतो.

## पहिल्याच पावसात खारघर रेल्वे भुयारी मार्ग पाण्याखाली

### नागरिकांची कसरत; भाजपच्या प्रभाकर घरत यांचे सिडकोला पत्र


**खारघर : रामप्रहर वृत्त**

सिडकोने तयार केलेला खारघर रेल्वे स्थानकाजवळील भुयारी मार्ग पहिल्याच पावसात पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील पाणी काढण्यासाठी पंप लावण्यात यावा, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडकोच्या संबंधित विभागाकडे ऑनलाइन पत्राद्वारे केली आहे.

सिडकोनिर्मित खारघर रेल्वे स्थानकाजवळील भुयारी मार्गावर शुक्रवारी व शनिवारी झालेल्या पावसात भरपूर पाणी साठत आहे. त्यामुळे येथून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांसह पादचाऱ्यांना कसरत करावी लागत आहे. भुयारी मार्गाच्या आतील पदपथावरही पाणी



साठल्याने चालकांचे हाल होत आहेत. पहिल्याच पावसात अशी अवस्था झाल्याने यंदाच्या पावसाळ्यात नागरिकांचे हाल होऊ नयेत म्हणून सिडकोने या मार्गावरील पाणी पंप लावून काढावे, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडकोच्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना ऑनलाइन पत्र पाठवून केली आहे.



# नवीन पनवेल येथे योग शिबिर आणि सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहयोग स्नेह सेवा संस्थानने नवीन पनवेल येथील सिडको मैदानात योग शिबिर आयोजित केले होते. या योग शिबिराला महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेविका राजश्री वावेकर, 'महामुंबई'च्या संपादक मुन्नावर सुलताना, पत्रकार मिलिंद खारपाटील, शिक्षिका दर्शना माळी आर्ट्स ऑफ लिव्हिंगचे झोनल कोओरडीनर प्रमोद कोकणे आदी उपस्थित होते.

या वेळी योग प्रशिक्षकांनी उपस्थित शंभराहून अधिक जणांना योग प्रशिक्षण दिले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईशवरीय विद्यालय पनवेल सेवा केंद्राच्या प्रमुख तारादीदी यांनी राजयोग मेडिटीशनबद्दल विस्तृत माहिती दिली. महापौर डॉ. कविता चौतमोल म्हणाल्या की, जीवनात योगाचे अनन्यसाधारण



महत्त्व आहे. ब्रह्माकुमारीज कडून योगा, वृक्षारोपण, केले जाते. यामुळे मी त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाला जाते.

या वेळी कोरोना काळात मदत कार्य करणाऱ्या भारतीय मानव विकास संघ उरण, द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन उरण, अभिनव मित्र मंडळ चिरनेर, ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनपाडा, सचिन तांडेल मेमोरियल फाउंडेशन कलंबूसरे तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या गौरी खारपाटील, सिमरन मोकल, समीक्षा काकडे या मुलींना सन्मानित करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांना तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन कबीर सिंग चांडक यांनी केले. आभार सहयोग स्नेह सेवा संस्थानच्या अध्यक्ष संतोषदीदी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# बालकामगारविरोधी दिनानिमित्त पनवेलमध्ये जनजागृती अभियान

**पनवेल : वार्ताहर**

कामगार उपायुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यात जागतिक बालकामगारविरोधी दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. १२) पनवेलमध्ये जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या जनजागृती अभियानामध्ये कामगार उपायुक्त रायगडचे प्रदीप पवार, सहाय्यक कामगार उपायुक्त समीर चव्हाण, सखी मंच आणि सुरक्षा रक्षक मंडळाचे सचिन ओव्हाळ, ममता मंचच्या स्मिता काळे आदी सहभागी झाले होते.

या वेळी बालमजुरी थांबवूया आणि उज्वल भारत घडवूया याबाबतचे फलक सुद्धा हाती घेऊन जनजागृती करण्यात आली. आजच्या जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिनाच्या औचित्याने जनजागृती करत असतो बालकामगारांना उज्वल भविष्यासाठी त्यांना काम न देता त्यांना शिक्षण द्यावे व देशाचे भविष्य उज्वल करावे व या अभियाना मध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कामगार उपायुक्त रायगडचे प्रदीप पवार यांनी केले.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. इन्फोसिस या प्रसिद्ध आयटी कंपनीचे सध्याचे सीईओ सध्या कोण आहेत?**
- **अ.** नारायण मूर्ती
- **आ.** विशाल सिक्का
- **इ.** सलील पारेख
- **ई.** नंदन निलकेणी

**२. १९९३ साली इन्फोसिस कंपनीचा आयपीओ आला होता. त्यावेळी त्याची ऑफर प्राईज किती होती?**
- **अ.** ९५ रुपये
- **आ.** ५०० रुपये
- **इ.** १२५ रुपये
- **ई.** १५०० रुपये

**३. इन्फोसिस कंपनीचे आज (ता. १० जून) चे बाजारमूल्य किती आहे?**
- **अ.** सहा लाख २१ हजार कोटी रुपये
- **आ.** सात लाख २१ हजार कोटी रुपये
- **इ.** पाच लाख ५० हजार कोटी रुपये
- **ई.** दहा लाख २१ हजार कोटी रुपये

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# भाजपची मुसंडी

राज्यसभा निवडणुकीची चर्चा अद्याप सुरूच आहे. या निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये विरोधी पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाने तीन पक्षांच्या महाविकास आघाडी सरकारला धोबीपछाड दिली. भाजपच्या या विजयाचे श्रेय माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना नि:संशय जाते. त्यांनी अचूक व्युहरचना करून शिवसेनेसह आघाडी सरकारला जोरदार धक्का दिला. या निवडणुकीत शिवसेनेची एक जागा कमी झाली असून भाजपची एक जागा वाढली आहे. हा पराभव शिवसेनेसाठी धक्कादायक मानला जात आहे.

**लोकशाहीप्रधान आपल्या देशात वर्षभर कुठे ना कुठे कोणत्या ना कोणत्या निवडणुका होतच असतात. दोन वर्षे कोरोनामुळे निवडणूक प्रक्रियेला खीळ बसली होती, पण कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर विविध निवडणुका होऊ लागल्या आहेत. यापैकी संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेत उमेदवार निवडून देण्यासाठी निवडणूक झाली. १५ राज्यांतील एकूण ५७ जागांसाठी राज्यसभा निवडणुकीची प्रक्रिया होऊ घातली होती. त्यापैकी ११ राज्यांतील ४१ जागांवर खासदारांची निवडणूक बिनविरोध झाली, तर महाराष्ट्रासह कर्नाटक, राजस्थान आणि हरियाणा या चार राज्यांमध्ये बिनविरोध निवडणूक होऊ न शकल्याने १६ जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले. यापैकी महाराष्ट्रातील निवडणूक चांगलीच गाजली. इथे भाजप आणि महाविकास आघाडी असा सामना होता. महाविकास आघाडीतील तीन पक्षांचे संख्याबळ तसेच अपक्षांचा आकडा पाहता आघाडीचे सर्व उमेदवार निवडून येतील असा कयास बांधला जात होता, मात्र भाजपने जबरदस्त उलटफेर केला. महाविकास आघाडीने २०१९मध्ये जेव्हा विश्वासदर्शक ठराव जिंकला होता तेव्हा त्यांचे एकूण १७० आमदार होते. यापैकी शिवसेनेचे रमेश लटके यांचे अलिकडेच निधन झाले, तर नवाब मलिक, अनिल देशमुख हे राष्ट्रवादीचे दोन आमदार सध्या तुरुंगात आहेत. त्यामुळे आघाडीचे संख्याबळ १६७ होते. एमआयएम व माकपने आघाडीला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे आघाडीच्या उमेदवारांना पहिल्या पसंतीची १६९ मते मिळायला हवी होती, पण शिवसेनेच्या सुहास कांदे या आमदाराचे मत केंद्रीय निवडणूक आयोगाने बाद ठरले. तरीही किमान १६८ मते मिळायला हवी होती, पण प्रत्यक्षात १६१ मतेच मिळाली, तर दुसरीकडे ११४ आमदार भाजपच्या बाजूने होते. यात भाजपच्या चिन्हावर निवडून आलेले १०५ आणि नऊ इतर आमदार होते. मधल्या काळात पंढरपूरची पोटनिवडणूक जिंकल्याने भाजपचे संख्याबळ १०६ अधिक नऊ असे ११५ झाले, तर राज्यसभा निवडणुकीत मनसेच्या एका आमदाराने भाजपला पाठिंबा दिल्याने ते संख्याबळ ११६ झाले. उभय प्रतिस्पर्ध्यांच्या संख्याबळाची तुलना करता आघाडीकडील सात मते वजा होऊन ती भाजपच्या उमेदवाराकडे गेली. त्यामुळे भाजपच्या अतिरिक्त तिसऱ्या उमेदवाराचाही विजय झाला. ही किमया साधली विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी. राष्ट्रवादीचे शरद पवार यांनीही जाहीरपणे फडणवीस यांचे कौतुक केले. यातच सारे आले. आता आघाडीत विशेषत: शिवसेनेवर चिंतन करण्याची वेळ आली आहे, कारण त्यांनी आपली एक जागा गमावली. राज्यसभेनंतर येत्या काही दिवसांत विधान परिषदेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीत काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# कर्जतमधील कोथळीगडाला ट्रेकर्सची पसंती





कोथळीगड हा किल्ला कर्जत या तालुक्याच्या ठिकाणापासून ईशान्येला साधारण २१ किमी अंतरावर असलेला किल्ला आहे. राजमाची आणि ढाक किल्ल्यांच्या आणि सिध्दगड, भीमाशंकरच्या अलीकडे दाट झाडीतून आपला उत्तुंग कातळकडा उभारून हा किल्ला इतिहासाची साक्ष देत उभा आहे. हौशी ट्रेकर्स आणि अभ्यासक यांच्यासाठी कोथळीगड हे हक्काचे ठिकाण आहे. पावसाळा सुरू झाला की ट्रेकर्सची पावले कोथळीगडाकडे वळतात. त्याच कोथळीगडाला शिवकालीन ऐतिहासिक महत्त्वदेखील आहेत

या किल्ल्याला पायथ्याच्या 'पेठ' या गावामुळे याला 'पेठचा किल्ला' असेही संबोधले जाते. काही ठिकाणी याचा उल्लेख कोथळा असाही आढळतो. लहानशा दिसणाऱ्या या किल्ल्याचा इतिहास मोठा रक्तरंजित आहे. त्याविषयाची माहिती मराठी व इंग्रजी कागदपत्रातून नव्हे तर मुघली कागदपत्रांमधून मिळते. हा किल्ला काही बलाढ्य दुर्ग नाही, पण एक संरक्षक ठाणं होता. मराठ्यांचे या किल्ल्यावर शस्त्रागार होते. संभाजीमहाराजांच्या काळात त्याला विशेष महत्त्वही प्राप्त झाले होते.

औरंगजेबाने नोव्हेंबर १६८४ मध्ये अब्दुल कादर व अलईबिरादरकानी यांना संभाजींच्या ताब्यातील किल्ले घेण्यासाठी पाठवले. 'कोथळागड' हा महत्त्वाचा असून जो कोणी तो ताब्यात घेईल, त्याचा ताबा तळकोकणावर राहील हे लक्षात घेऊन अब्दुल कादर याने हा किल्ला घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तो या किल्ल्याच्या जवळपास गेला आणि तेथे राहणाऱ्या लोकांना त्याने आपले नोकर म्हणून ठेवून घेतले. मराठे या किल्ल्यातून शस्त्रांची नेआण करतात, हे कळताच अब्दुल कादर व त्याचे ३०० बंदूकधारी नोव्हेंबर १६८४ मध्येच गडाच्या पायथ्याशी पोहचले. मराठ्यांनी त्यांना मागे हटवले, पण तरीही काही लोक किल्ल्याच्या मगरकोट दरवाज्याजवळ पोहचले आणि त्यांनी 'दरवाजा उघडा' अशी आरडाओरड सुरू केली. किल्ल्यावरील मराठा सैन्याला वाटले की आपलेच लोक हत्यारे नेण्यासाठी आले आहेत, म्हणून त्यांनी दरवाजा उघडला. दरवाजा उघडताच मोगल सैनिक आत शिरले मराठे व मोगल यांच्यात लढाई झाली. अब्दुल कादरच्या मदतीसाठी माणकोजी पांढरेही आले, त्यावेळी झालेल्या लढाईत मोगलांना यश आले.

दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी किल्ल्याला वेढा घातला, फार मोठी लढाई झाली. या लढाईत बाणांचा व बंदुकींचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. या लढाईत किल्ल्यावरचा दारूगोळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. गडावर जाणारी सामुग्री मराठ्यांनी लुटल्यामुळे मुघल सैन्याला दारूगोळा व धान्य मिळेनासे झाले. दरम्यानच्या काळात अब्दुल कादरच्या मदतीला कोणीच न आल्यामुळे त्याची परिस्थिती कठीण झाली. वेढा टाकल्यानंतर दहा बारा दिवसांनी जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजिजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला सैन्यासह अब्दुल कादरच्या मदतीला पाठवले. अब्दुलखान तेथे पोहचला तेव्हा त्याची वाट अडवण्यासाठी मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक यांनी तेथील खोरे रोखून धरले होते. येथेही लढाई झाली नारोजी त्रिंबक व इतर सरदार धारातीर्थी पडले आणि कोथळागड मुघलांच्या ताब्यात गेला. इहमतखानाने नारोजी त्रिंबकाचे डोके रस्त्यावर टांगले किल्ला जिंकून सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठवण्यात आली. औरंगजेबाने कोथळागड नावाचा असा कोणता गड अस्तित्वात आहे का? याची खात्री करून मगच अब्दुलखानाला बक्षिसे दिली. मुघलांनी गडाला 'मिफ्ताहुलफतह' (विजयाची किल्ली) असे नाव दिले. फंदफितुरीमुळे मराठ्यांच्या हातून हा मोक्याचा किल्ला निसटला.

**खबरबात**
**संतोष पेरणे**

यानंतर गड परत मिळवण्यासाठी मराठ्यांनी प्रयत्न सुरू केले. डिसेंबर १६८४ मध्ये गडाकडे जाणार्या मुघल सैन्याला मराठ्यांनी अडवले. नंतर मऱ्हामतखानालाही ७००० मराठ्यांच्या तुकडीने अडवले. पण मराठ्यांना यश लाभले नाही. त्यानंतर एप्रिल १६८५ मध्ये ७०० जणांच्या तुकडीने पुन्हा हल्ला केला. २०० जण दोरीच्या शिडीच्या मदतीने किल्ल्यात उतरले. बरेच रक्त सांडले, पण मराठ्यांची फत्ते होऊ शकली नाही. मराठ्यांनी हा महत्त्वाचा किल्ला गमावला होता. पुढे १८१७ च्या नोव्हेंबरमध्ये दुसर्या बाजीराव पेशव्याच्या वतीने बापुराव नामक शूर सरदाराने हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यातून सोडवला. सुमारे १८६२पर्यंत किल्ल्यावर माणसांचा राबता होता.

किल्ल्याच्या पायथ्या जवळचा पेठ गावातून चहुबाजूंनी तासल्या सारखा पेठचा सुळका दिसतो. पायवाटेने वर पोहोचल्यावर पायर्यांचे व प्रवेशव्दाराचे अवशेष दिसतात. पुढे कातळाच्या पोटात खोदलेल्या गुहा दिसतात. प्रथम आहे ती देवीची गुहा, पाण्याची टाकी आणि मग डावीकडे ऐसपैस अशी भैरोबाची गुहा. या गुहेचे वैशिष्ट्य म्हणजे सपाट, समतल भूमी आणि छताला आधार देणारे कोरीव नक्षीदार खांब. गुहेत ४५ ठिकाणी गोल खळगे आहेत आणि काही जूने तोफेचे गोळे आहेत.

गुहेजवळच एका ऊर्ध्वमुखी भुयारात किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्यासाठी व्यवस्थित पायऱ्या कोरलेल्या आहेत. पायऱ्यांच्या मार्गावर उजवीकडे गज शिल्प कोरलेले आहे. पायर्यांच्या शेवटी दगडात कोरून काढलेला दरवाजा आहे. त्यावर शरभ शिल्प आहे. गडमाथ्यावर पाण्याची दोन टाकी आहेत. गडमाथ्यावरुन भीमाशंकरकडील कलावंतिणीचा महाल, नागफणी, वाघाचा डोळा, सिद्धगड, कल्याणकडील हाजीमलंग, चंदेरी, प्रबळगड, इर्शाळगड, माणिकगड, माथेरानचे पठार हा विस्तृत मुलूख नजरेच्या टप्प्यात येतो. गडमाथ्यावरुन परत गुहेजवळ येउन सुळक्याला प्रदक्षिणा घालतलताना वाटेत पाण्याच्या टाक्यांचे दोन समुह व एक लेण पाहायला मिळते. याशिवाय गडावर प्रवेशव्दाराच्या उजवीकडे खाली उतरल्यावर तसे गावात मारुती मंदिरा जवळ तोफ पाहायला मिळते.

किल्ल्यावर भैरोबाच्या गुहेत २०-२५ जण व्यवस्थित राहू शकतात. त्याशिवाय खाली पायथ्याशी पेठ गावात शाळेत अथवा मंदिरात व्यवस्था आहे. त्याचवेळी स्थानिक लोकांकडे आधी कळविल्यास भोजनाची व्यवस्था आणि नाश्ताची व्यवस्था होत असते.

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवरील डिलीट केलेले मेसेजही आता वाचता येणार

सर्वांत लोकप्रिय मेसेजिंग ॲप्सपैकी एक व्हॉट्सॲपने वेळोवेळी अशी अनेक नवीन फीचर्स जारी केली आहेत, ज्यामुळे वापरकर्त्यांसाठी चॅटिंग अधिक मनोरंजक आणि सोपे झाले आहे. या फीचर्सपैकी एक प्रमुख फीचर म्हणजे डिलीट मेसेज. आज आपण अशी एक ट्रिक जाणून घेणार आहोत, ज्याद्वारे तुम्ही हे डिलीट केलेले मेसेज वाचू शकता आणि समोरच्या व्यक्तीला कळणारही नाही.



जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲपवर वैयक्तिक किंवा ग्रुपमध्ये मेसेज करता तेव्हा तुमच्याकडे तो मेसेज डिलीट करण्याचाही पर्याय असतो. वापरकर्ता त्याचा संदेश स्वत:साठी किंवा सर्वांसाठी डिलीट करू शकतो, जेणेकरून तो संदेश समोरच्या व्यक्तीला दिसणार नाही. मेसेज पाठवल्यानंतर काही काळासाठीच इतरांसाठी मेसेज डिलीट करण्याचा पर्याय शिल्लक राहतो.

या फीचरमुळे बऱ्याच गोष्टी नक्कीच सोप्या झाल्या आहेत, पण ज्याला मेसेज वाचायला मिळत नाही त्याची खूप चिडचिड होते. हे मेसेज वाचण्यासाठी व्हॉट्सॲपकडून कोणतीही ट्रिक समोर आलेली नाही, पण अनेक थर्ड-पार्टी ॲप्स आहेत ज्यांच्या मदतीने तुम्ही डिलीट केलेला मेसेजही वाचू शकाल आणि मेसेज डिलीट करणाऱ्याला हे कळणारही नाही.

अँड्रॉइड वापरकर्ते डब्ल्यूएएमआर आणि व्हॉट्सरिमूड+ सारखे थर्ड-पार्टी ॲप्स डाउनलोड करून दिलीत केलेले मेसेज किंवा मीडियामध्ये प्रवेश करू शकता, मात्र आयओएस युजर्ससाठी डिलीट केलेले मेसेज वाचण्याकरिता अद्याप कोणतेही थर्ड-पार्टी ॲप उपलब्ध नाही, पण थर्ड पार्टी ॲप्सऐवजी ॲपल यूजर्स त्यांच्या आयफोनच्या नोटिफिकेशन सेंटरमधून हे डिलीट केलेले मेसेज वाचू शकतात.

हे सर्व थर्ड-पार्टी ॲप्स ते मेसेज डिलीट होण्यापूर्वी तुमच्या स्मार्टफोनमध्ये या मेसेजची कॉपी सेव्ह करतात. हे ॲप्स संदेशांसह फोटो, व्हिडिओ आणि लिंक्सदेखील स्टोर करतात. हे ॲप्स तुम्हाला डिलीट केलेले मेसेज वाचण्याची परवानगी देतात, परंतु ते पूर्ण सुरक्षिततेसह येत नाहीत, ज्यामुळे तुमच्या फोनमध्ये व्हायरस येऊ शकतात.

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

## निमित्त



आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे मराठीतील अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ञ, चित्रपटनिर्माते-दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते होते. आज त्यांची पुण्यतिथी आहे. यानिमित्त जाणुन घेऊया प्रल्हाद केशव अत्रेविषयी.

त्यांचा जन्म सासवड (जिल्हा पुणे) ह्या गावी झाला असून सासवड, पुणे, मुंबई व लंडन या ठिकाणी बी. ए., बी. टी., टी. डी. पर्यंत शिक्षण झाले. नंतर पुण्यातील कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत प्रथम शिक्षक व पुढे प्राचार्य म्हणून काम केले.

पुण्याच्या नगरपालिकेचे काही काळ ते सदस्य होते. १९३३ पासून नाट्यक्षेत्रात व पुढे चित्रपटसृष्टीतही त्यांनी प्रवेश केला. १९३९ नंतर मुंबईला स्थलांतर. १९४०मध्ये सुरू केलेल्या साप्ताहिक नवयुगपासून अखेरपर्यंत वृत्तपत्रक्षेत्रातच ते राहिले. याचबरोबरच अत्रे थिएटर्स या नाट्यसंस्थेमार्फत रंगभूमीशीही त्यांचे व्यावासायिक संबंध होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी आपली वाणी व लेखणी यांद्वारे मोठे कार्य केले.


प्रथम 'मकरंद' व नंतर 'केशवकुमार' या टोपणनावांनी अत्रे यांनी काव्यलेखन केले. झेंडूची फुले (१९२५) हा त्यांच्या विनोदी व विबंडन कवितांचा संग्रह आहे. अत्र्यांच्या नाट्यलेखनाचा पहिला कालखंड १९३३ ते १९६० हा होय. मराठी रंगभूमीची हा अवनतकाळ होता. त्या नाटकांत सामाजिक दोषदर्शन व दंभस्फोट आहेत; पण उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या द्वारा ते प्रकट केले आहेत. साष्टांग नमस्कार (१९३३), भ्रमाचा भोपळा (१९३५) व लग्नाची बेडी (१९३६) ही त्यांपैकी काही लोकप्रिय नाटके होत. घराबाहेर (१९३४) व उद्याचा संसार (१९३६) ही त्यांची विशेष गंभीर व सामाजिक समस्यात्मक नाटके आहेत. त्या काळात विशेष अनुकरणीय ठरलेल्या इब्सेन या नॉर्वेजियन नाटककाराचा संस्कार वरील दोन नाटकांवर झाल्याचे जाणवते.

मराठी रंगभूमीवरील अखंड प्रयोगशीलतेच्या व तीव्र स्पर्धेच्या या कालखंडातही त्यांची सर्वच नाटके लोकप्रिय ठरली. त्यांचे कथात्मक साहित्य त्यांच्या विडंबनकाव्यासारखे वा नाटकांसारखे प्रभावी ठरले नाही. विनोदी कथा लिहूनही विडंबनकाव्याप्रमाणे अशा कथांची परंपरा मात्र त्यांना निर्माण करता आली नाही. त्यांचे चांगले कखात्मक साहित्य काहीसे गंभीर व वास्तवपूर्णच आहे. त्यात चांगुणा (१९५४) ही कादंबरी व बत्ताशी व इतर कथा (१९५४) यांचा समावेश होतो.

मराठी चित्रपटसृष्टीत पटकथालेखक म्हणून व पुढे स्वतंत्र निर्माते म्हणून अत्र्यांनी महत्त्वाचे कार्य केले. धर्मवीर, प्रेमवीर, ब्रह्मचारी व ब्रँडीची बाटली हे त्यांचे काही लोकप्रिय चित्रपट होत. त्यांच्या श्यामची आई या चित्रपटास राष्ट्रपतींचे सुवर्णपदक (१९५४) व महात्मा फुले या चित्रपटास रौप्यपदक (१९५५) मिळाले. नाटकांप्रमाणेच अत्र्यांच्या चित्रपटांचा आरंभ विनोदाने झाला व परिणती गांभीर्यात झाली. त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा (१९५८) प्रसिद्ध झालेल्या आहेत.

नाशिक येथे १९४२मध्ये भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अडतिसावे नाट्यसंमेलन (बेळगाव, १९५५), दहावे मराठी पत्रकार-संमेलन (१९५०) आणि बडोदे, इंदूर व ग्वाल्हेर येथील प्रादेशिक साहित्यसंमेलने यांची अध्यक्षपदेही त्यांनी विभूषित केली होती. मुंबई येथे ते निधन पावले.

**लेखक : रा. ग. जाधव**
**माहिती स्त्रोत : मराठी विश्वकोश**



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : मान्सूनचे कोकणात आगमन झाले असून आता आकाशात काळे ढग दिसू लागले आहेत. या बदलत्या ऋतूचक्राचे एकदरा पुलावरून टिपलेले दृश्य.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या सकाळी उठल्यानंतर कोणते पाणी पिणे चांगले

सकाळी उठल्यानंतर पाणी प्यायल्यास आरोग्याशी निगडित समस्या दूर होतात. त्यामुळे सकाळी उठून अनेकजण पाणी पितात. तर जाणून घ्या कोणते पाणी प्यायलास आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांवर मात करता येते.

बऱ्याचदा तज्ञ अशा काही गोष्टी रिकाम्या पोटी खाण्याचा सल्ला देतात, जे आरोग्यासाठी चांगले असते, शिवाय अनेक समस्यांपासून दूर राहण्यासदेखील मदत करतात. अशा परिस्थितीत काही लोक सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी तांब्याचे पाणी सेवन करतात, परंतु तांब्याच्या पाण्याशिवाय मडक्याचे पाणीदेखील सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तर जाणून घेऊया रिकाम्या पोटी पाणी पिण्याचे फायदे तसेच कोणते पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे.



शिळ्या तोंडी सकाळी उठून जर तुम्ही पाणी पित असाल तर रेफ्रिजरेटरचे पाणी कधीच पिऊ नये. हे आरोग्यास हानी पोहचवू शकते. जर एखाद्या व्यक्तीने रिकाम्या पोटी फ्रीजमधील पाणी प्यायले तर त्याचा पचनसंस्थेवर नकारात्मक परिणाम तर होतोच, पण त्या व्यक्तीला पोटाशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. फ्रीजच्या पाण्यामुळे आतड्यांमध्ये सूज येऊ शकते आणि बद्धकोष्ठता, अपचनदेखील होऊ शकते.

सकाळी शिळ्या तोंडी जर तुम्ही पाणी पित असाल, तर त्यामुळे तुमचे शरीर हायड्रेट तर राहतेच, पण त्यामुळे शरीराचे तापमानही कमी होते. मडक्याचे पाणी शरीराला थंड ठेवते आणि शरीरात साचलेल्या विषारी पदार्थांना बाहेर काढण्यासाठीदेखील उपयुक्त आहे. याशिवाय मडक्यातील पाण्याचे सेवन केल्याने शरीरात पित्त संतुलित राहते आणि पोटाच्या समस्यांही दूर होतात. त्यामुळे रिकाम्या पोटी पाण्याचे सेवन जर तुम्ही करीत असाल, तर तांब्याच्या पाण्यासोबतच मडक्यातील पाण्याचे सेवन करणेदेखील आरोग्यासाठी चांगले आहे. हे पाणी प्यायल्यास अनेक समस्या दूर होतील तसेच शरीरही चांगले राहण्यास मदत होईल.

# रायगडावर तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा जल्लोषात



**महाड : महेश शिंदे**

**शिवकालीन पारंपरिक वेशभूषेत रायगडावर आलेल्या शिवप्रेमींच्या उपस्थितीत आज रविवारी (दि. १२) किल्ले रायगडावर तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक साजरा झाला. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष आसमंतात दुमदुमला. तुतारींतून निघालेल्या ललकारी, ढोलताशांचा गजर आणि विविध धार्मिक विधी, पूजापाठ, वेद–मंत्रघोषाने मंगलमय झालेल्या रायगडावरील वातावरणात शिवरायांच्या प्रतिमेवर जल आणि दुग्धाभिषेक करण्यात आला. वरुणराजानेही हजेरी लावून आसमंतातून केलेला जलाभिषेकाच्या साक्षीने रायगडावर शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा झाला.**

शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती, कोकणकडा मित्र मंडळ आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी तिथीप्रमाणे आज ३४९ वा शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला. पावसाळी वातावरण असुनही हजारो शिवप्रेमींनी मोठ्या उत्साहात या सोहळ्याला हजेरी लावली होती. या वेळी लोकप्रतिनिधींसह समितीचे अध्यक्ष सुनिल पवार, कोकणकडा मित्र मंडळाचे सुरेश पवार उपस्थित होते.

रायगडाची गडदेवता शिरकाई मातेच्या पूजनाने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रायगडवाडीच्या सरपंच प्रेरणा सावंत उभयतांच्या हस्ते येथे पूजन करण्यात आले. राजसदरेवरील मेघडंबरी फुलांनी सजविण्यात आली होती. रात्री शाहिरी पोवाडे, जगदंबेचा जागर व गोंधळाने रायगडावर रंगत आली. पहाटे साडेवाजता ध्वजारोहण सोहळा व श्री शिवप्रतिमापूजन करण्यात आले.

गडावरील विविध देवी–देवतांची विधीवत पूजा झाल्यानंतर धर्मशाळा ते राजदरबार अशी शिवरायांच्या मूर्तीची पालखी सदरेवर वाजत गाजत आणण्यात आली. या मिरवणुकीत महाराजांची पालखी राजदरबारात दाखल होताच प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक कार्यक्रमाला सुरूवात झाली.

गडावर विविध धार्मिक विधी, पूजापाठ, वेद–मंत्रघोषाने रायगडाच्या कडेकपारी रोमांचित झाल्या होत्या. पावसाचा गारवा व दाट धुक्यातही शिवप्रेमींमधील अलोट उत्साह दिसत होता. मध्येच येणारी पावसाची सरही कार्यक्रमाची शोभा वाढवत होती.

ब्रह्मवृंदाच्या मंत्रघोषात वेदउच्चारासोबत सकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा सिंहासनाधिष्टीत करण्यात आली. त्यानंतर महाराजांच्या प्रतिमेवर सुवर्ण नाण्यांचा व दुग्धाभिषेक करण्यात आला. एकूणच कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी मोठी उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष आसमंतात दुमदुमला







### *दिमाखदार असा कार्यक्रम*

*छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेवर सप्तसिंधूंच्या पाण्याने जलाभिषेकही करण्यात आला. हा क्षण होळीचा माळ, बाजारपेठ येथे उपस्थित असलल्या हजारो शिवप्रेमींची उत्कंठा शिगेला नेऊन ठेवणारा होता. राज्याभिषेकानंतर हलगी, ढोलताशे, लेझीम अशा वाद्यात, शिवजयघोषात शिवप्रेमींच्या उत्साहात शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक राजसदरेहून होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर अशी नेण्यात आली. होळीच्या माळावर दांडपट्टे, लाठीकाठी, तलवारबाजी अशा मर्दानी खेळाबरोबरच लेझीम सादरीकरणही दिमाखात करण्यात आले.*



# एमआयडीसी प्रकल्पाविरोधात पेणच्या शेतकऱ्यांचे आंदोलन

## वडखळ येथे शेतकरी एकवटले; मोजणीला केला तीव्र विरोध

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ विभागातील जवळपास १३ गावांमध्ये होऊ घातलेल्या एमआयडीसी प्रकल्पाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमच्या जमिनीची मोजणी प्रशासनाला करू देणार नाही, असा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला आहे. शासन आमची दिशाभूल करून आमच्या जमिनी हडप करत असल्याचा आरोप करीत शेतकऱ्यांनी शनिवारी (दि. ११) शासनाकडून मोजणीसाठी आलेल्या अधिकारीवर्गाला तीव्र विरोध केला.

पेण वडखळ येथे शेतकरी शनिवारी एकवटले होते. आधी सुविधा पुरवा मग एमआयडीच्या प्रकल्पाला हात घाला असा इशाराच या दरम्यान शेतकऱ्यांनी दिला आहे. या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांची भेट घेऊन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्याशी दुरध्वनीवरून संपर्क साधला. तसेच मोजणी करण्यापूर्वी शेतकरी आणि प्रशासन यांची सोमवारी संयुक्त बैठक लावण्यात यावी. जोपर्यंत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही यासह शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना त्या जमिनीचा भाव काय किंवा इतर कोणत्या नागरी सुविधा देण्यात येणार आहेत, हे लेखी स्वरूपात स्पष्ट करावे असेही आमदार पाटील यावेळी म्हणाले.

जिल्हाधिकारी, प्रांत कार्यालयापर्यंत आंदोलने करून आणि स्थानिक आमदारांच्या माध्यमातून अधिवेशनात दोन वेळा मुद्दा उपस्थित करून आमच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचल्या आहेत. हा लढा आम्ही गेले दीड ते दोन वर्षे देत आहोत, मात्र शासनाला आमची काहीही कदर नाही. शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा डाव शासनाने मांडला आहे, अशी व्यथा अकरा गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी मांडली. दरम्यान संजय जांभळे यांनी या वेळी उपस्थित होते.

# रोहा नगर परिषद प्रभागातील आरक्षण, सोडतीकडे लक्ष

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषदेच्या होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागातील जागांचे आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम सोमवारी (दि.१३)११ वा.रोहा नगरपरिषदेचे कै. द. ग. तटकरे सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नगरपरीषदेचे मुख्याधिकारी धिरज चव्हाण यांनी दिली आहे. त्यामुळे नगर परिषद प्रभागातील आरक्षणाकडे सारेच पक्षातील नेत्यांचे लक्ष लागले आहे. इच्छुक उमेदवारांमध्ये आरक्षणामुळे कोणाचा पत्ता कट होणार व कोणाचा प्रभाग अनकूल ठरणार हे आज होणाऱ्या आरक्षण सोडतीत ठरणार आहे.

सोमवारी (दि. १३) ओबीसी आरक्षण विनाच आरक्षण सोडत होणार असून या होणाऱ्या सोडत पद्धतीने अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व महिला आरक्षणासह राखीव ठेवायच्या जागा यांचे आरक्षण संबधीत अधिनियम, नियमानुसार व राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना नुसार निश्चित करण्यात येणार आहे. आज रोहा अष्टमी नगरपरिषदेत राष्ट्रवादी पक्षाची सत्ता आहे. रोहा अष्टमी नगरपरीषदेत गेल्या निवडणुकीत १२ राष्ट्रवादी, काँग्रेस व शिवसेना प्रत्येकी एक, तीन अपक्ष निवडून आले होते. त्यामध्ये दोन अपक्षांनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केले होते.तर जुबेर चोगले हे अपक्ष म्हणून कायम राहीले होते. आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी ३ जागा वाढल्याने एकूण २० जागांसाठी निवडणूक होणार आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे राज्यातील महाविकास आघाडीचे गठबंधन नगरपरीषदेत कायम राहणार का की शिवसेना व राष्ट्रवादी पक्षात सरळ लढत होणार हे आगामी निवडणुकीतच कळेल. मात्र शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होण्याची संभावना जास्त आहे असे ही बोलले जाते. या निवडणुकीसाठी वरीष्ठ स्तरावर काय निर्णय होतील यावर या निवडणुकीच्या लढतीचे चित्र स्पष्ट होईल. तर दुसरीकडे भारतीय जनता पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यासह अन्य पक्ष कोणती भूमिका नगरपरीषद निवडणुकीत घेतात हे पहावे लागेल.

# पाली येथे पाण्याच्या टाकीत पडलेल्या गाईला मिळाले जीवदान



**पाली : प्रतिनिधी**

पालीतील स्वामी समर्थ नगर येथील एका इमारतीच्या सिमेंटच्या कोरड्या पाण्याचा टाकीत रविवारी (दि. १२) एक गाय पडली होती. टाकीत पडलेली गाय चार ते पाच तास आत अडकल्याने बाहेर पडण्यासाठी धडपडत होती. या गाईला येथील नगरसेवक व स्थानिक नागरिकांनी मोठ्या शर्थीने बाहेर काढून जीवदान दिले.

गाय टाकीत पडली आहे हे येथील रहिवाशी उपेक्षा राऊत यांनी पाहिले. त्यानंतर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते सूरज शेळके यांना सांगितले. शेळके आणि अन्य नागरिक घटनास्थळी पोहचले. अतिशय निमुळत्या जागेतून ही गाय टाकीत पडली होती. त्यामुळे तिला बाहेर काढणे जिकीरीचे व कठीण होते. जेसीबीच्या सहाय्याने टाकीचे काँक्रीट फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र निमुळत्या जागेमुळे तो प्रयत्न अयशस्वी ठरला. त्यानंतर यातील दोन नागरिकांनी टाकीत उतरून गाईला रस्सीने बांधले. सर्व नागरिकांनी मिळून गाईलावर खेचुन सुखरूप बाहेर काढले. अशा प्रकारे या गाईला जीवदान मिळाले.

# गणवेश खरेदीसाठी पालक-विद्यार्थ्यांची गर्दी

**कर्जत : प्रतिनिधी**



(छाया : विजय मांडे)

कोरोनाच्या संकटामुळे शाळा बंद होत्या. त्यानंतर शाळा ऑनलाइन सुरू असल्याने मुलांना गणवेश पाहिजेच असे नव्हते. दोन वर्षे ही परिस्थिती होती. मात्र १५ जूनपासून बहुतांश शाळा सुरू होणार असल्याने गणवेश खरेदीसाठी पालक आणि चिमुरड्या विद्यार्थ्यांनी एकच गर्दी केली आहे. दरम्यान ठिकठिकाणच्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी दिसून येत आहे.

दोन वर्षांनंतर लहान मुले प्रत्यक्ष शाळेत जात असल्याने त्यांना गणवेश खरेदी करावा की नाही? अशी परिस्थिती होती, कारण कोरोनाची चौथी लाट येते की काय असे वाटत होते. परंतु शाळा वेळेवर सुरू होणार असल्याने तसेच शेवटचा रविवार असल्याने गणवेश खरेदीसाठी अनेक दुकानांमध्ये गर्दी दिसत होती. प्रत्येक शाळेचा वेगवेगळा गणवेश असल्याने कोणत्या शाळेचा कोणता गणवेश आहे? हे पूर्णपणे माहीत नाही. त्यामुळे दुकानदारांनाही मोठा प्रश्न पडत आहे. तरीही पालक आणि विद्यार्थ्यांचा उत्साह असल्याने दुकानांमध्ये गर्दी दिसत आहे.

# शितल गायकवाड इंटरनॅशनल हेल्थकेअर पुरस्काराने सन्मानित

## माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर यांच्या हस्ते सन्मान

**पाली : प्रतिनिधी**



रायगड़ जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय कराटेपटू व क्रीडा शिक्षक शितल कृष्णा गायकवाड यांना २०२२ सालचा इंटरनॅशनल हेल्थकेअर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई अंधेरी येथील हॉलिडे इन हॉटेल येथे पार पडलेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांच्या हस्ते शितल गायकवाड यांना प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारासाठी सहा हजार महिलांचे नामांकन आले होते. यात पाच महिलांची निवड करण्यात आली. यात शीतल गायकवाड यांचा समावेश असल्याचे शितल गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान शितल गायकवाड यांनी यापूर्वीही अनेक राष्ट्रीय, आंतरराज्य राज्य पुरस्कार प्राप्त केले आहेत. शितल गायकवाड या खोपोली येथील केएमसी महाविद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलींना प्रशिक्षित करण्यात खर्ची घातले आहे. के.एम.सी.महाविद्यालयातील प्राचार्य तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव व कार्यकारिणी यांचे नेहमीच सहकार्य मिळत असल्याचे शितल यांनी बोलताना सांगितले.

शितल गायकवाड़ यांनी जिद्द महत्त्वकांक्षा, आत्मविश्वास व कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. मनात मांडले व त्यासाठी आवश्यक मेहनत घेतली तर आपण यश मिळवू शकतो असा विश्वास शितल यांनी व्यक्त केला.

# सांगडे येथील मोरे कुटुंबीयांचा वृक्षारोपणाने समाजापुढे एक आदर्श

**रोहे :** रोहा तालुक्यातील सांगाडे येथील कै. लक्ष्मण बाळू मोरे यांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणी कायम रहाव्यात यासाठी कुटुंबीयांतील मुलांनी वृक्षारोपण करीत समाजापुढे वेगळा आदर्श ठेवला आहे.

रोहा तालुक्यातील सांगाडे येथील कै. लक्ष्मण बाळू मोरे यांचे दि. २६ मे २०२२ रोजी अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले होते. त्यांचे विधिवत सर्व कार्य पार पडले. हे कार्य पार पडल्यानंतर त्यांच्या वडिलांची आठवण कायम राहावी या करीता मोरे कुटुंबीयांच्यावतीने समाजापुढे वेगळा आदर्श ठेवण्यात आला आहे. त्यांच्या तेराव्याच्या दिवशी एकूण १३ वृक्षांची लागवड पोलीस संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी वडिलांच्या आठवणी कायमच जाग्या रहाव्यात यासाठी केले आहे.



(छाया : महादेव सरसंबे)


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जिल्हा – रायगड, पनवेल – ४१०२०६.

**निवडणुक विभाग**

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक – २०२२**

**सहपत्र – १**

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहिर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दि. १३ जुन, २०२२ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे, निवडणुक कार्यालय मुख्यालय येथे सादर कराव्यात.) | सोमवार, दि. १३ जुन, २०२२ ते शुक्रवार, दि. २४ जुन, २०२२ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |
| **टिप :– हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वंतत्रपणे कळविण्यात येईल.** | | |

प्रारुप प्रभाग रचना नकाशे, अधिसूचना व प्रभांगाच्या व्याप्ती/ चतु:सीमा या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.panvelcorporation वर तसेच खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असतील.

१. पनवेल महानगरपालिका, मुख्यालय.
२. प्रभाग समिती– अ, खारघर, पनवेल महानगरपालिका
३. प्रभाग समिती– ब, कळंबोली, पनवेल महानगरपालिका
४. प्रभाग समिती– क, कामोठे, पनवेल महानगरपालिका
५. प्रभाग समिती– ड, पनवेल, पनवेल महानगरपालिका

ठिकाण : पनवेल महानगरपालिका, पनवेल
दिनांक : १३/०६/२०२२
पमपा/निवडणुक/जा.क्र. ००२३/२०२२
दिनांक : १०/०६/२०२२

सही/–
(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

# तळोजा एमआयडीसीत पाणीटंचाई

## उद्योगांना फटका; 'टीआयए'ने मांडले मंत्र्यांकडे गाऱ्हाणे, उपाययोजनेची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नागरी वसाहती प्रमाणे तळोजा एमआयडीसीमध्येही पाणी टंचाई निर्माण झाली आहे. मागणीप्रमाणे पाणी मिळत नसल्याने आता कारखानदारांना टँकरने पाणी मागवावे लागत आहे. त्यामुळे वेळ आणि पैसे खर्च होत आहे. त्याचबरोबर उद्योग आणि उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे. या संदर्भात तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन (टीआयए)ने थेट उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. यानंतर तटकरे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.



(संग्रहित छायाचित्र)

तळोजा परिसरात ९०७ हेक्टर जागेवर एमआयडीसी बसविण्यात आली. या ठिकाणी आजमितीला ८२३ छोटे-मोठे कारखान्यांची नोंद आहे. त्यामध्ये इंजिनीअरिंग, माशांवर प्रक्रिया, फूड, केमिकल्स आदी कारखानांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात कारखाने आणि औद्योगिक उलाढाल होत आहे. तळोजा एमआयडीसीत दीपक फर्टिलायझर, फूट ग्लास. महाराष्ट्र वखार महामंडळ, किंग फिशर, भारत इलेक्ट्रॉनिक्स, बॉम्बे बेवरेज, विस्ता फुड यासारख्या मोठ्या कंपन्यांत आहेत. या ठिकाणी हजारो कामगार काम करतात.

कारखानदारांना टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. बॉयलर करिता पाण्याची नितांत गरज आहे. वेळेत आणि जास्त दराने पैसे देऊनसुद्धा एमआयडीसी आवश्यक ते पाणी देत नसल्यामुळे कारखानदार हवालदिल झाला आहे. याच प्रश्नावर टीआयएच्या पदाधिकाऱ्यांनी सतीश शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांची मंगळवारी भेट घेतली.

या वेळी एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तळोजा इंडस्ट्रिजचे अध्यक्ष शेट्टी यांनी एमआयडीसी पाण्याची पाईपलाईन बांधणे, व्ही आणि टी ब्लॉकमधून जाणार्या पाइपलाइन वळवून ती अभियांत्रिकी व केमिकल झोनपर्यंत विस्तारित करण्याचा प्रस्ताव दिला. हे पाऊल केमिकल आणि इंजिनिअरिंग झोनमधील पाण्याची समस्या कमी करेल असे मत त्यांनी व्यक्त केले. कारण पाणी नंतर उच्च गुरुत्वाकर्षणाने वाहू शकते, कारण पाण्याच्या पाइपलाइनच्या भौगोलिक संरेखनामुळे, जी उताराच्या मार्गावर चालते असेही सतीश शेट्टी यांनी सांगितले. राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी एमआयडीसीला त्यानुसार अतिरिक्त पाइपलाइन बांधण्याच्या सूचना केल्या. या मंजुरी करता सहा महिन्यांचा कालावधी लागेल असे अधिकाऱ्यांनी या वेळी सांगितले. त्यानुसार र कार्यवाही करण्याबाबत सांगण्यात आले. या वेळी उद्योग विभागाचे सहसचिव,संजय देऊळगावकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवी कटकधोंड यांच्यासह तळोजा इंडस्ट्रियल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, एमआयडीसीकडून आता बिगर औद्योगिक पाणीपुरवठा कमी करून हे पाणी उद्योगांना देण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता यशस्वी एस. व्ही. राऊत यांनी बैठकीमध्ये सांगितले.

### ४० ते ४५ एमएलडी पाण्याची आवश्यकता

*तळोजा औद्योगिक वसाहतीसाठी ४० ते ४५ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार एमआयडीसीकडून पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. परंतु सध्याला सुमारे १५ एमएलडी पाणी कमी मिळत आहे. त्याचा परिणाम उत्पन्नावर होत असून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही पाणी टंचाई गंभीर समस्या बनली आहे.*

---

# निवडक



## पारसिक हिलवर स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई :** पारसिक हिल सर्व्हिसेस सेवा को.ऑप.क्रेडिट सोसायटीच्या वतीने पारसिक हिलवर स्वच्छता जनजागरण मोहीम आयोजित केली होती. यामध्ये रहिवाशी, मॉर्निंग वॉकर्स व सर्व स्तरातील नागरिक सहभागी झाले होते. या वेळी माजी नगरसेवक तथा सभागृह नेते रवींद्र इथापे, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, अरूण निकम, मोकाशी, नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, नारायण भार्गव, अशोक खाडे, संजय भगत, दीप्ती भार्गव, प्रतिमा पटेल, पिनाकिन पटेल, उदय सावंत, अनिल शाह, सागर सावंत, एस. पी. व्दिवेदी, राजीव शर्मा, गणेश मोरे, चौबे हे या मोहिमेत सहभागी होते. या वेळी सभागृह नेते रवींद्र इथापे यांच्या हस्ते सहभाग घेणाऱ्या सर्वांना सन्मानित करण्यात आले.

## ज्येष्ठांकडून पर्यावरणविषयक कार्यक्रम

**नवी मुंबई :** ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक भवनमध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरुवारी (दि. ९) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सृष्टी वाचवायची असेल तर स्वतःबरोबर पुढील पिढीला म्हणजेच लहान मुलांना निसर्गाचे महत्त्व पटवून द्यावे, असे पर्यावरणस्नेही विद्याधर वालावलकर यांनी सांगितले. या वेळी वृक्षमित्र आबा रणावते यांनीदेखील निसर्गाची माहिती सांगितली. झाडांचे महत्त्व आपल्या जीवनात अग्रस्थानी आहे हे त्यांनी सर्वांना पटवून दिले. तसेच अनेक औषधी वनस्पतींचे उपयोग प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले. प्रथमोपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधी वनस्पतींची त्यांनी माहिती दिली. या कार्यक्रमास पांडुरंग क्षेत्रमाडे, अरविंद वाळवेकर, दीपक दिघे, विकास साठे, रेखा वाळवेकर, रमेश गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.

## नागरिकांना छत्रीचे वाटप

**नवी मुंबई :** पर्यावरणप्रेमी सुनील सुतार यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पामबीच मार्गावर वृक्षारोपण करीत सामाजिक उपक्रमाची सुरुवात केली. सेक्टर १७ येथील जनसंपर्क कार्यालयात त्यांनी पावसाळ्यानिमित्त नागरिकांना छत्रीचे वाटप केले. यानंतर वाशी गावात असणाऱ्या झोपडपट्टीमध्ये शाळा सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांना वही-पुस्तक व पेनचे वाटप करण्यात आले. वाढत्या कोरोना रुग्णांमुळे झोपडपट्टीवासीयांना मास्कचे वाटप करण्यात आले.



## स्व. संजय गायकवाड यांना श्रद्धांजली

**नवी मुंबई :** सामाजिक कार्यकर्ते व जनकल्याण सामाजिक संस्थेचे सातारा जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. संस्थेतर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. वाशी येथे आयोजित या सभेत दिवंगत गायकवाड यांना पुष्पहार अर्पण करताना संस्थेचे अध्यक्ष राजेश शर्मा यांनी स्व. संजय गायकवाड यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान संस्थेचे प्रभारी बलदेव सिंग यांनी स्व. गायकवाड यांच्या केलेल्या सामाजिक कार्याची सविस्तर माहिती दिली. या वेळी पत्रकार विनोद प्रधान, युवा नेते मफतलाल चव्हाण, आरटीआय कार्यकर्ते विजय नायर, संस्थेचे उपाध्यक्ष लालजी शर्मा, सरचिटणीस सुरेंद्र सरोज, नवी मुंबईचे माजी अध्यक्ष मनोज सिंग यांच्यासह अनेकांनी कै. गायकवाड यांना श्रद्धांजली वाहिली.

---

# पावसाळा आला तरी रस्ते खोदाई सुरूच!

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहराच्या विविध भागांत जून महिन्यातही रस्ते खोदाई सुरू आहे. महापालिकेतर्फे मलनिस्सारण विभागाची कामे सुरूच आहेत. त्यामुळे पावसाळ्यात वाहनचालक आणि नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागणार आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामध्ये रस्त्यांची करून ठेवलेली खोदकामे, तसेच काम पूर्ण झाल्यानंतर अर्धवट अवस्थेतील मलमपट्टीमुळे रस्त्यांची वाताहत झाली आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात वर्षभरापासून सुरू असलेली कामे अद्यापही अपूर्ण आहेत. महापालिकेच्या पाणीपुरवठा, मलनिस्सारण विभागाबरोबरच एमआयडीसी, एमआरव्हीसी, एमएमआरडीए कार्यालयांकडून विविध कामे केली जात आहेत. त्यामुळे रस्ते खोदाई केली जाते. दिघा येथील मुकुंद कंपनीजवळ, ऐरोली सेक्टर एकजवळ, ऐरोली सेक्टर चार, सतरा या ठिकाणी अंतर्गत रस्ते खोदण्यात आले आहेत. शहरात १५ मे अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. १५ मे नंतर रस्ते खोदाईला परवानगी पालिकेने देणे बंद केली आहे; पण शहरातील विकासकामांमुळे रस्ते खोदाई सुरूच आहे. मलनिस्सारण वाहिन्या टाकण्याचे काम करण्यात येत आहे. रस्ते खोदाईमुळे पावसाळ्यात वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे.

> **अत्यावश्यक असणाऱ्या कामांनाच फक्त परवानगी देण्यात आली आहे. जर आवश्यक कामाशिवाय कोणी रस्ते खोदाई करत असल्यास त्यांच्यावर पालिकेकडून कारवाई करण्यात येईल.**
> **-संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका**

---

# पाण्याअभावी दुभाजकावरील रोपे सुकली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे-बेलापूर मार्गावरील रस्ते दुभाजकामध्ये नवी मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने लहान रोपटी लावण्यात आली आहेत. शोभेसाठी असलेली ही झाडे सुरुवातीच्या काळात दुभाजकांची शान वाढवणारी ठरली. नंतर त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे दुभाजकातील लहान रोपट्यांची अवस्था वाईट झाली आहे. त्यात सध्या उन्हाचा पारा वाढला असल्याने अनेक शोभेची रोपटी कडक उन्हाच्या झळांनी करपून गेली आहेत; तर काही झाडे पाण्याअभावी सुकून गेली आहेत.

दिघा ते रबाळेदरम्यान येणाऱ्या रस्ते दुभाजकातील शोभा वाढवणारी झाडे पाण्याअभावी पूर्णतः सुकून गेली आहेत. त्यात काही झाडांच्या फक्त फांद्याच उरल्या आहेत. झाडांची हिरवळ नाहीशी झाल्याने करपलेल्या झाडांमुळे दुभाजक भकास दिसत आहे. कोपरखैरणेपासून तुर्भे पर्यंत काही ठिकाणी पामची झाडे आहेत. पावणे उड्डाणपुलाखाली झाडांसोबत गवतदेखील वाढू लागले आहे. या ठिकाणी संबंधित ठेकेदाराकडून नियमितपणे पाणी पुरवले जात असल्याने झाडांची हिरवळ टवटवीत आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्वत्र शहर नटवले जाते; पण दुभाजकातील हिरवळीकडे उद्यान विभागाने लक्ष देऊन पर्यावरणाचे जतन करण्यासाठी वेळीच झाडांच्या निगराणीकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत पर्यावरण सेवाभावी संस्थेकडून व्यक्त करण्यात आले.

> **शहरातील रस्त्यांमधील दुभाजकातील रोपट्यांना पाणी देण्यात येते. मात्र काही ठिकाणी रोपटी करपली असल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.**
> **-जयदीप पवार, उद्यान उपायुक्त, नवी मुंबई महापालिका**

---



## ब्रह्मचैतन्य संगीत सभेचे सातवे पुष्प उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सूर निरागस हो या संगीतप्रेमी समूहाच्या वतीने आयोजित ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे सातवे पुष्प झाले. गोंदवलेकर महाराज साधना केंद्रामधे झालेल्या या संगीतसभेमधे मुलुंड येथील प्रसिद्ध शास्त्रीय गायक अजय रिसबुड यांचे गायन संपन्न झाले.

या कार्यक्रमाला प्रा. अंबादास देशमुख, गायिका वैशाली कुलकर्णी, चंद्रकांत ताह्मनकर आदी मान्यवरांसह संगीतप्रेमींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. पं. अरुण कशाळकर यांचे शिष्य असलेल्या अजय रिसबुड यांनी मैफिलीची सुरवात आग्रा घराणेची खासियत म्हणजे नोमतोम या सादरीकरणाने केली.

प्रारंभी 'श्री' हा गंभीर राग आळवून शास्त्रीय संगीताचे प्रसन्न वातावरण निर्माण केले. त्यानंतर राग केदार रागातील एक बंदिश पेश केली. नंतर स्वतः संगीतबद्ध केलेला विठ्ठलभक्तीपर अभंग आणि 'वाजे वृंदावनी वेणू' व 'आम्हा न कळे ज्ञान' या रचना सादर केल्या. त्याना अथर्व देव यांनी संवादिनी, गणेश घाणेकर यानी तबला, विशाल जोगळेकर यानी पखवाज व समीर सोमण यानी तालवाद्यांची साथ केली.

---

# नवी मुंबई इमारत दुर्घटनेतील एकाचा मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील सेक्टर १७मध्ये शनिवारी (दि. ११) दुपारी भीषण दुर्घटना घडली होती. जिमी पार्क इमारतीच्या ए विंगमधील सहाव्या मजल्यापासून सर्व घरांच्या हॉलचा स्लॅब पहिल्या माळ्यापर्यंत पत्त्याप्रमाणे कोसळला. यात एक २९ वर्षीय तरुण ठार, तर सात रहिवाशी गंभीर जखमी झाले आहेत.



आचानक घडलेल्या या प्रकारामुळे इमारतीमधील रहिवाशी आणि परिसरातील नागरिक यांची एकच पळापळ उडाली. महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना ढिगाऱ्या बाहेर काढले आणि नजीकच्या डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल केले. ज्या सहा मजल्यापासून हॉलचा भाग तळमजल्यापर्यंत कोसळून ही दुर्घटना घडली. त्यामध्ये ६ मजल्यावरील घरामध्ये लादी बसवण्याचे काम सुरू होते.

नेरुळ येथील सेक्टर १७ मधील जिमी पार्क ही इमारत प्लॉट नंबर १८२ डी येथे ही नऊ माळ्यांची इमारत आहे. या इमारतीला १९९४ साली महापालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे. आज दुपारी १२.३० च्या सुमारास इमारतीच्या ए विंगमधील सहाव्या माळयावरील घराच्या हॉलचा संपूर्ण स्लॅब पाचव्या माळ्यावरील घरात कोसळला. त्यामुळे पाचव्या माळ्यावरील हॉलचा स्लॅबही खाली कोसळत अशा पध्दतीने पहिल्या माळ्यापर्यंत सर्वच घरातील हॉलचे स्लॅब कोसळले. या दुर्घटनेत व्यंकटेश नाडर (२९) हा तरूण जागीच ठार झाला असून सुब्रमण्यम त्यागराजन (८४), निशा धर्मानी (५०), रिया धर्मानी (२०), सोनाली गोडबोले (२९), आदित्यराज गोडबोले (१५), सौमित्र गोडबोले (५०) आणि ललिता त्यागराजन (८०) हे सात जण जखमी झाले. त्यांना तातडीने नजीकच्या डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जिमी पार्क इमारत अतिधोकादायक यादीमध्ये नाही, परंतू या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेण्याबाबत या सोसायटीला महापालिकेने नोटीस दिली होती. मात्र स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नाही. ही दुर्घटना नेमकी कोणत्या कारणामुळे घडली, हे जाणून घेण्यासाठी तज्ञांचे पथक घटनास्थळी पाठवले आहे. तसेच व्हीजेटीआयकडूनही या इमारती स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात येणार आहे. इमारत खाली करुन येथील नागरीकांची व्यवस्था शहरातील भवन व नेरुळ येथील समाज मंदीर येथे करण्यात आली आहे, असे पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.

---

# नवी मुंबईत हॅपी स्ट्रीट उपक्रम

## शिवराज्याभिषेक सोहळा ठरला आकर्षण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आमदार मंदाताई म्हात्रे व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त नेरूळ पामबीच मार्ग येथे आयोजित करण्यात आलेला हॅपी स्ट्रीट उत्साहात झाला.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, हॅपी स्ट्रीटसारखे पहाटे तसेच नयनरम्य वातावरणात होणारे कार्यक्रम कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली तीन वर्षे निर्बंध असल्यामुळे घेण्यात आले नव्हते. तसेच नवी मुंबईकरांचे व लहान मुलांचे आरोग्य निरोगी राहावे, त्यांचे जीवन तणावमुक्त व्हावे याकरिता योगसाधना, चित्रकला, सायकलिंग, मोकळ्या रस्त्यावर स्केटिंग, हस्तकला, झुंबा, योगासने असे विविध कार्यक्रमाची रेलचेल शिवराज्याभिषेक दिनानिमित्त नवी मुंबईकरांना पहावयास मिळाली. विशेषतः आज शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जो पामबीच येथे शिवराज्याभिषेक सोहळा झाला तो आकर्षित ठरला.




नवी मुंबई मनपाच्या वतीने स्वच्छता अभियान व आरोग्य विभागाकडून मलेरिया, डेंगू यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना अशा अनेक आरोग्यविषयावर माहिती देण्यात आली. तसेच मनराव चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने जे मुकबधीर, कर्णबधीर, अपंग मुला-मुलींने दिलेले पर्यावरणाविषयी संदेश झाडे लावा, झाडे जगवा, जल है तो कल है व पर्यावरणाचा समतोल कसा राहिला असे अनेक पर्यावरणाला उपयुक्त ठरतील, असे संदेश या मनराव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने देण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक दीपक पवार, पांडुरंग आमले, जगन्नाथ जगताप, राजू तिकोने, विनायक गिरी तसेच अनेक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

---

# पनवेलमध्ये रस्ते सुरक्षा जनजागृती कार्यशाळा

**खारघर : प्रतिनिधी**

रस्ते अपघातात मृत्युमुखी पावणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. या गंभीर आणि समाजाच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर जनजागृती कार्यशाळा शुक्रवारी (दि.१०) फडके नाट्यगृहात झाली. सारथी सुरक्षा सेवा संस्था यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम झाला.

वाहनांच्या दहशतवादामुळे कशाप्रकारे निष्पापांना बळी गमवावा लागतो. अनेक वेळा स्वतः नागरिकामुळे अपघाताच्या दुर्दवी घटना घडत असतात. याबाबत अतिशय सोप्या पद्धतीने सारथी संस्थेचे विनय मोरे यांनी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पनवेलमधील आयटीआय संस्थेचे जवळपास ५०० विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. रस्ते अपघाताची कारणे, वाहतुकीचे नियम,वाहतूक नियमांचे उल्लंघन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सहाय्यक परिवहन अधिकारी सचिन विधाते, सारथी संस्थेचे संस्थापक विनय मोरे, सारथी सुरक्षा ब्रँड अँबेसिडर सतीश देशमुख, विश्वविख्यात इल्ल्युजनिस्ट रवी मोरे, सारखी सुरक्षा सेवा संस्थेचे प्रवक्ते प्रदीप गायकवाड, उद्योजक विकेश सिंग, कॅप्टन इंद्रजीत यादव, आयटीआय पनवेल प्रतिनिधी दिगंबर राजे, कल्पेश बालघरे, कार्यक्रमाचे संयोजक रूपाली विनय मोरे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना वाहतुक नियमांमध्ये जनजागृती करीत प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. या वेळी विद्यार्थ्यांना १० हेल्मेट भेट देण्यात आले. तसेच वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करणारे पुस्तक भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उस्फुर्तपणे या कार्यक्रमात सहभाग घेत वाहतूक नियम पाळण्याबाबतची कबुली या कार्यक्रमात दिली.

> **रस्ते अपघातात मृत्युमुखी पावणारांची संख्या जगभरात मोठी आहे. विशेष म्हणजे दहशतवादी हल्ल्यापेक्षा रस्ते अपघातात मृत्यू पावणारांची संख्या अधिक असल्याने वाहनांचा दहशतवाद थांबवला पाहिजे. वाहतुकीचे नियम पाळत असताना रस्त्यावर चालणाऱ्या प्रत्येक पादचाऱ्यांचा सन्मान हा केला गेला पाहिजे.**
> **-विनय मोरे, सारथी संस्था**

# पोलादपुरातील ५२ गावांना दरडीचा धोका

## ■ सात गावांत पूरस्थितीची भीती; संभाव्य धोकादायक गावांकडे होतेय दुर्लक्ष

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तब्बल ५२ गावांचा संभाव्य दरडग्रस्त गावांच्या आणि ७ गावांचा संभाव्य पूरग्रस्त गावांच्या यादीत समावेश आहे. आपत्ती निवारणकामी सज्ज राहण्याचे आदेश प्राप्त झाल्याने यावर्षी पोलादपूर तालुक्यापासून सुटका मिळवू इच्छिणाऱ्या अधिकारी व सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा खोळंबा झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच संभाव्य धोकादायक गावांकडे पाहिजे तसे लक्ष दिले गेले नसल्याचे दिसून येत आहे.



(छाया–शैलेश पालकर)

पोलादपूर तालुक्यात नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित परिस्थिती या दोन कारणांमुळे दरडप्रवण क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. मात्र, यादीमध्ये मानवनिर्मित परिस्थितीचा स्पष्ट व स्वतंत्र उल्लेख नसल्याने आपत्ती निवारणकामी संभाव्य दरडप्रवण क्षेत्राखालील गावांची नावे वाढली तर याबाबत कोणतीही गांभिर्याने उपाययोजना केली जात नसल्याचा अनुभव गेल्या अनेक वर्षांपासूनचा आहे. दरडग्रस्त गावांच्या यादिमध्ये केवनाळे गावाचा समावेश असूनही कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

यंदा संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये लोहारे, कोतवाल खुर्द, सवाद, चरई, केवनाळे, पार्ले, कोंढवी, सडवली, तुटवली, ओंबळी, महाळुंगे, परसुले, येलंगेवाडी–भोगाव, माटवण, हावरे, कणगुले, धामणदिवी, हळदुळे, साखर चव्हाणवाडी, तुर्भेखोंडा, बोरावळे कोडवेकोंड, केवनाळे आंबेमाची, वाकण धामणेची वाडी, चांदके, खोपड, मोरसडे आडाचाकोंड, चिखली, वडघर सोनारवाडी, कामथे, कामथे फौजदारवाडी, मोरसडे बालमाची, मोरसडे सडेकोंड, आडावळे बुद्रुक, लहुळसे, कालवली भोसलेवाडी, कातळी कामतवाडी, कुडपण खुर्द, किनेश्वर, किनेश्वर पेठेवाडी, कापडे खुर्द रवतळवाडी, कुंभळवणे कापडे खुर्द, वाकण मुरावाडी, नाणेघोळ कुदूवाडी कदमवाडी, नाणेघोळ गावठाण, नाणेघोळ बाबरवाडी, नावाळे, महादेवाचा मुरा–बोरघर, चांदले, मोरसडे दिवाळवाडी, कुडपण बुद्रुक, चांभारगणी खुर्द, साखर सुतारवाडी आदी ५२ गावांचा समावेश असून पुराचा धोका असणाऱ्या गावांमध्ये पोलादपूर शहर, तुर्भे बुद्रुक, सवाद, चरई, वाकण, कापडे बुद्रुक आणि माटवण आदी गावांचा समावेश आहे. मात्र, याखेरिज, माती व दगड उत्खननासह वृक्षतोड मोठया प्रमाणात झालेल्या ठिकाणी दरडसदृश्य मानवनिर्मित परिस्थिती निर्माण झाली आहे.

### आपत्ती निवारणाची सज्जता अन् बदल्यांचा खोळंबा

पोलादपूर तालुक्यात ठिकठिकाणी आपत्ती निवारणाच्या मदत आणि बचाव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्यानंतर आगामी ऑक्टोबर महिन्यातील संभाव्य जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चार जागांसाठीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर तालुक्यात तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजाविलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पाल्यांच्या शैक्षणिक वर्षांची सुरूवात होण्यापूर्वी बदल्या होतील, अशी अपेक्षा आहे. मात्र, आगामी पूर आणि दरडसदृश्य नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत जुलै महिन्यात सतर्कता आणि सज्जता ठेवण्याचे आदेश प्रशासनाला प्राप्त झाल्याने बदल्या लांबणीवर पडण्याची शक्यता असल्याने हा खोळंबा सरकारी कर्मचाऱ्यांना चिंताजनक ठरला आहे.

# मुरूड तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींची मुदत संपणार

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील वावडुंगी, वेळास्ते, तेलवडे, काकळघर, कोर्लेई या पाच ग्रामपंचायतींची मुदत नोव्हेंबरमध्ये संपणार असल्याने या गावांमध्ये आतापासूनच रणधुमाळी सुरू झाली आहे. मुदत संपणाऱ्या मुरूड तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींचे आरक्षण नुकतेच विशेष ग्रामसभा घेऊन काढण्यात आले आहे.

परिणामी एकीकडे उमेदवारांची चाचपणी सुरू असताना पाच ग्रामपंचायतींची मुदत येत्या नोव्हेंबर २०२२ला संपत आहे. या ग्रामपंचायतीची प्रभाग रचना नुकतीच जाहीर झाली आहे. प्रभाग रचनेची अधिसूचना सहा जुन रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पाच ग्रामपंचायतीच्या प्रभागाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयात जाहीर केला. त्यादृष्टीने सर्व ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभा सहा जूनला झाल्या. या सर्व ठिकाणी आरक्षण सोडत निश्चितीसाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्यात आले होते.

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेत अनुसूचित जाती महिला अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला प्रभागाचे आरक्षण काढले गेले. आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना प्रशासनाने मागवली असून त्यासाठी सात ते १० जूनपर्यंत मुदत दिली आहे. प्राप्त हरकती विचारात घेऊन प्रांताधिकारी १५ जूनला अभिप्राय देतील. त्यानंतर २७ जुलैला जिल्हाधिकारी अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात येणार आहे.

# नेरळमध्ये विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

नेरळजवळील नेरळ–कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील धामोते गावातील प्रभात अपार्टमेंट जवळ विजेची वाहिनी खाली जमिनीवर कोसळली होती आणि त्या विजेच्या वाहिनीला धक्का लागल्याने शेतकऱ्यांची दुभती म्हैस जागीच मृत्युमुखी पडली. ही घटना शनिवारी (दि.११) घडली. दरम्यान, शेतकऱ्याने आपल्याला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी केली असून नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

अधिक वृत्त, भूषण दत्तात्रय गोमारे या शेतकऱ्यांच्या म्हैशी कोल्हारे गावातून धामोते अंबानी बोपेले भागात चरायला जात असतात. नेहमीप्रमाणे गोमारे हे आपल्या म्हैशी घेऊन १० जून रोजी सायंकाळी धामोते भागात आले होते. त्यावेळी प्रभात अपार्टमेंट चरायला जात असलेल्या एका म्हशीला तेथे जमिनीवर कोसळलेल्या विजेच्या वाहिनीचा धक्का बसला आणि काही क्षणातच ती दुभती म्हैस तेथे पडली. शेतकऱ्याने आजूबाजूच्या शेतकऱ्यांना हाक दिली. त्यानंतर स्थानिकांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी बोलावून घेतले. मात्र दुभती म्हैस मृत झाल्याने शेवटी संबंधित शेतकऱ्याने नेरळ पोलीस ठाणे येथे जाऊन महावितरणच्या चुकीमुळे आपली दुभती म्हैस जीवानिशी गेली असल्याची तक्रार दिली. दरम्यान, महावितरणकडून नुकसानभरपाई मिळावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करु अशी माहिती महावितरणचे शाखा अभियंता राठोड यांनी दिली आहे.



# बारावीच्या परीक्षेत सुधागड तालुका जिल्ह्यात अव्वल

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचा बारावीचा निकाल ९८.२१ टक्के लागला असून रायगड जिल्ह्यात सुधागड तालुका अव्वल ठरला आहे. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पालीतील ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयाची समिक्षा शेखर तळेकर ही वाणिज्य शाखेत अव्वल तर जय संजय बारस्कर विज्ञान शाखेत अव्वल आला आहे. विदिशा मंगेश वाघमारे कला शाखेत पहिली आली.

बारावीच्या परीक्षेत सुधागड तालुक्यातील ६६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये ३८९ मुले व २७१ मुलींचा समावेश आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तहसीलदार दिलीप रायअन्नावर, गटविकास अधिकारी विजय यादव, गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास व पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्यासह मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

तालुक्यातील जांभूळपाडा येथील एस.ए.एस.एस.आत्मोन्नती विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला तर नांदगाव येथील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयचा निकाल ९५.८३ टक्के लागला. तसेच बल्लाळ विनायक प्रशाला व गुरुकुल कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८.४१ टक्के लागला. वावळोली येथील आदिवासी प्राथमिक, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला, श्री राज एज्युकेशन सेंटर कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

# वाहनचालकांनो जरा जपून...!

## रस्त्यावर जातोय सरपटणाऱ्या जीवांचा बळी

**पाली : प्रतिनिधी**

पावसाला नुकताच सुरु झाला आहे. या हंगामात साप, सरडे इत्यादी सरपटणारे प्राणी भक्ष्य शोधत बाहेर फिरतात. खाद्य गोळा करण्यासाठी त्यांच्या हालचाली वाढत आहेत. मग बऱ्याच वेळा हे प्राणी रस्त्यावर येऊन वाहनांखाली येत त्यांचे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या जिल्ह्यात असा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ असल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी प्राण्यांच्या संख्येत लक्षणीय घट होऊन पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची भीती पर्यावरण प्रेमींकडून व्यक्त होत आहे.



साधारणतः दिवड, धामण, नानेटी, घोणस, तस्कर, मांजऱ्या, नाग, मण्यार तसेच अन्य प्राणी रस्त्यावर येऊन त्यांच्या मृत्यू होत आहे. शेतकऱ्यांसाठी सुद्धा हे प्राणी अधिक महत्त्वाचे आहेत. विशेषतः साप तर शेतकऱ्यांचा मित्रच आहे. हे सर्व सरपटणारे प्राणी आपल्या पर्यावरणाचे आणि संबंधीत परिसंस्था अबाधित ठेवण्याचे काम करतात. अन्नजाळी आणि अन्न साखळीत या प्रत्येक प्राण्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

दरम्यान, साप हा उपद्रवकारक उंदरांना खातो. तसेच सरडे आणि बेडूक हे पिकांवरील किटक व कृमी खातात. त्यामुळे शेतीचे नुकसान टळते. रायगड जिल्हा हा निसर्ग सौंदर्याने नटलेला असून येथे विविध प्रकारची जैवविविधता आढळते. येथील बहुतांश रस्ते हे जंगलातुनच जातात. साप, सरडे, बेडूक यांच्या प्रजननाचा हंगाम असल्याने या प्राण्यांची हालचाल वाढत आहेत. तसेच खाद्य मिळविण्यासाठीही त्यांना फिरावे लागते. दरम्यान, हे प्राणी रस्त्यावर येतात आणि वाहनांखाली चिरडून मरतात. वाहनचालकांनी योग्य सावधानता बाळगत सुरक्षितपणे वाहन चालविल्यास या प्राण्यांचा जीव वाचू शकतो असे मत पर्यावरण प्रेमींनी या दरम्यान व्यक्त केले आहे.

**सरपटणारे प्राणी पर्यावरणासाठी अधिक महत्त्वाचे आहेत. आपल्या घरात, लोकवस्तीत किंवा औद्योगिक क्षेत्रात कोणताही साप आढळल्यास घाबरुन न जाता त्याला दुखापत न करता जवळील सर्पमित्रास बोलावणे आवश्यक आहे. घराबाहेर किंवा मोकळ्या जागेत साप असल्यास त्याला न घाबरवता वाट मोकळी करुन द्यावी.**

**–तुषार केळकर, सर्पमित्र**

# जेएसडब्ल्यू डोलवी वर्क्सला सीआयएसएफकडून अत्याधुनिक सुरक्षा; भारतातील तेरावा कारखाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

जेएसडब्ल्यू डोलवी वर्क्सच्या कारखान्यात सुरक्षेचा स्तर वाढविण्यासाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) उच्च कौशल्ययुक्त आणि हत्यारधारी कमांडोंची नेमणूक करण्यात आली आहे. जेएसडब्ल्यू वर्क्स हा सीआयएसएफच्या सुरक्षा आदेशांतर्गत आलेला जेएसडब्ल्यू ग्रुपचा पहिला आणि कॉर्पोरेट भारतातील तेरावा औद्योगिक कारखाना आहे.




सीआयएसएफ टीमच्या नव्या जबाबदारीचा परिचय करून देण्याच्या प्रसंगी कारखाना प्रमुख आशीष चंद्रा, सुरक्षा व जनसंपर्क प्रमुख कॅ. राजेशकुमार रॉय आणि जेएसडब्ल्यूमधील दक्षता विभागाचे प्रमुख डीआयजी (निवृत्त) सुरेश कुमार उपस्थित होते. सीआयएसएफच्या पश्चिम विभागाचे आयजी के. एन. त्रिपाठी या अभिमुखता प्रसंगासाठी उपस्थित होते.

जेएस डोल्वी वर्क्समध्ये जेएसडब्ल्यू ग्रुपच्या स्टील व सिमेंट उद्योगाचा एक सर्वात मोठा कारखाना आहे. त्याला जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून धरमतर बंदर संचालनाचे सहाय्य लाभले आहे. हा एक स्टील निर्मिती कारखाना होता. हा कारखाना इस्पात इंडस्ट्रीजकडून २०१० मध्ये जेएसडब्ल्यूने संपादित केला. गेल्या १० वर्षांत सिमेंट व बंदर कामकाज स्थापन करण्यासोबतच जेएसडब्ल्यू ग्रुपने या कारखान्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.

जेएसडब्ल्यू स्टीलचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर गजराज सिंग राठोड यांच्या मते, जेएसडब्ल्यू डोल्वी वर्क्सचे मोक्याचे ठिकाण लक्षात घेता महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवरील हा एक महत्त्वाचा लँडमार्क आहे. गेल्या दशकभरात, स्टील, सिमेंट व पायाभूत सुविधा उद्योगामध्ये आपल्या कामकाजाचे विस्तारीकरण करण्यासाठी जेएसडब्ल्यू ग्रुपने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. आमच्या कारखान्याचे महत्त्व लक्षात घेता विविध सुरक्षा जोखीमांपासून वाढीव संरक्षण गरजेचे होते. म्हणूनच जेएसडब्ल्यू डोलवीमधील सुरक्षेचे व्यवस्थापन करण्यासाठी अत्याधुनिक कौशल्य असलेल्या प्रोफेशनल संस्थेची नियुक्ती करण्याची विनंती आम्ही केंद्र सरकारला केली होती. सीआयएसएफतर्फे भारतातील ३५० अस्थापनांना संरक्षण देण्यात येते. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातर्फे अवकाश अस्थापना, बंदरे, विमानतळे, अणुऊर्जा विभा, दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन, राजधानीतील शासकीय इमारती, व्हीआयपी सुरक्षा आणि इतर देशांतर्गत सुरक्षा पुरविण्यात येते.

# मुरूड तालुका मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. संजय पाटील बिनविरोध

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका मेडिकल असोसिएशन या संघटनेच्या अध्यक्षपदी मजगाव येथील डॉ. संजय पाटील यांची नुकताच बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



संघटनेची विशेष सभा नुकतीच मुरूड येथे घेण्यात आली. मावळते अध्यक्ष डॉ. मकबुल कोकाटे यांनी प्रास्ताविक केले. या सभेत संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यात डॉ. निसार बिरावटकर व डॉ. मंगेश पाटील (उपाध्यक्ष), वसीम पेशमाम (सचिव), सुनील पटेल (खजिनदार), डॉ. भाविका, कल्याणी, सदफ पेशमाम (सर्व आयोजक) यांचा समावेश आहे. डॉ. मयुर कल्याणी, केतकी पाटील, हाशीम उलडे, अन्सार चोगले यांची कार्यकारीणी सदस्यपदी तर डॉ. राज कल्याणी, रवींद्र नामजोशी, डॉ. मकबूल कोकाटे यांची सल्लागारपदी निवड करण्यात आली. या वेळी नवनिर्वाचित डॉ. संजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

# माणगाव ज्युनिअर कॉलेजचे बारावीच्या परीक्षेत सुयश

**माणगाव : प्रतिनिधी**

बारावीच्या परीक्षेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. कॉलेजच्या विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९७.८३ टक्के लागला आहे.

तेजस्विनी सचिन शेठ या विज्ञान शाखेच्या विद्यार्थिनीने ८८.३३ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तर अर्पिता महिपत टेंबे (८५.८३ टक्के) दुसरी व संस्कृती विशाल येलवे (८५.३३ टक्के) तिसरी आली.

वाणिज्य शाखेत मयांक गणेश सावंत याने पहिला, दिपाली पांडुरंग गावडे हिने दुसरा तर प्रिया गणेश पाटील हिने तृतीय क्रमांक मिळविला. कला शाखेत रिद्धी गणेश वडेकर पहिली आली तर आशिष चिंतामण ठाकूर आणि अक्षय गोपीनाथ धोत्रे यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला. प्राचार्य तानाजी ढमाल, उपमुख्याध्यापक डी. एम. जाधव यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# खोपोलीत पुस्तक प्रकाशन सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुभाष कटकदौंड यांच्या साक्ष या कादंबरीचे गुरुवारी (दि. ९) खोपोलीतील ज्येष्ठ नागरिक सभागृहात प्रकाशन करण्यात आले. साक्ष कादंबरी वाचनीय असल्याची ग्वाही कोमसापचे जनसंपर्क प्रमुख प्रा. एल. बी. पाटील यांनी या वेळी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्राह्मण सभेचे माजी अध्यक्ष नरेंद्र हर्डीकर यांनी केले. वैद्यकीय क्षेत्रातील कामाच्या व्यापातूनही डॉ. सुभाष कटकदौंड हे साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे कोमसापचे जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ यांनी सांगितले. लेखक डॉ. कटकदौंड यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश राजोपाध्ये यांनी केले. कोमसाप खोपोली शाखेच्या अध्यक्षा उज्ज्वलाताई दिघे, माजी उपजिल्हाधिकारी यशवंत गायकवाड, ज्येष्ठ विचारवंत श्यामभाऊ कांबळे, डॉ. टिळक, ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष चौधरी, वामनराव दिघे, प्रा. ननावरे, गंगाराम साळवी, यशवंत सपकाळ, अनिल रानडे, माजी नगरसेविका केविना गायकवाड यांच्यासह साहित्यप्रेमी नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते.




(छाया : विनायक माडपे)

‘एफआयएच’ प्रो लीग हॉकी

# भारताचा बेल्जियमवर रोमहर्षक विजय



**अँटवर्प : वृत्तसंस्था**

गोलरक्षक पीआर श्रीजेशने शूटआऊटमधील पेनल्टी स्ट्रोक अडवल्यामुळे भारताने शनिवारी ‘एफआयएच’ प्रो हॉकी लीगमधील बेल्जियमविरुद्धच्या पहिल्या सामन्यात ५-४ असा रोमहर्षक विजय मिळवला. अखेरच्या सत्रात श्रीजेशने दोन महत्त्वाचे गोलसुद्धा वाचवले.

निर्धारित वेळेतील आठ मिनिटे शिल्लक असताना भारतीय संघ १-३ असा पिछाडीवर होता, परंतु दोन गोलच्या बळावर ३-३ अशी बरोबरी साधत हा सामना पेनल्टी शूटआऊटपर्यंत लांबवला. यातील बेल्जियमचा ॲलेक्झांडर हेंड्रिक्सचा तिसरा प्रयत्न श्रीजेशने हाणून पाडला. मग बेल्जियमने ४-४ अशी बरोबरी साधली, पण अखेरच्या प्रयत्नात आकाशदीपने गोल साधत भारताला ५-४ असा विजय मिळवून दिला.

सामन्यातील पहिला गोल भारताच्या शमशेर सिंगने दुसऱ्या सत्रात १८व्या मिनिटाला केला. मग बेल्जियमच्या केड्रिक चार्लियरने २१व्या मिनिटाला बरोबरी साधली. तिसऱ्या सत्रात सिमॉन गाँगनार्डने बेल्जियमला आघाडी मिळवून दिली. मग चौथ्या सत्रात निकोलस डी केर्पेलने ५१व्या मिनिटाला संघाची आघाडी ३-१ अशी वाढवली. ५१व्या मिनिटाला हरमनप्रीत सिंग आणि ५७व्या मिनिटाला जर्मनप्रीत सिंगच्या गोलमुळे भारताला बरोबरी साधता आली.

दरम्यान, भारतीय महिला हॉकी संघाचा मात्र बेल्जियमकडून निसटता पराभव झाला. भारताची अनुभवी हॉकीपटू राणी रामपालचा हा २५०वा आंतरराष्ट्रीय सामना होता. बेल्जियमकडून बार्बारा नीलीन (तिसऱ्या मिनिटाला) आणि एमरी बॉलींगहेन (३५व्या मिनिटाला) यांनी गोल केले, तर भारताकडून एकमेव गोल लालरेमसियामीने (४८व्या मिनिटाला) केला.

## नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेचे कार्लसनला जेतेपद



**स्टॅव्हंगर (नॉर्वे) : वृत्तसंस्था**

भारताचा माजी विश्वविजेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने नॉर्वे स्पर्धेच्या पारंपरिक (क्लासिकल) विभागातील नवव्या आणि अखेरच्या फेरीत आर्यन तारीवर मात केली, मात्र स्पर्धेअखेरीस त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. नॉर्वेचा जगज्जेता बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनने अपेक्षित कामगिरी करताना या स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

अखेरच्या फेरीत ५२ वर्षीय आनंद आणि तारी या दोघांमधील नियमित लढत २२ चालींअंती बरोबरीत सुटली. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या अर्मागेडन डावात आनंदने ८७ चालींमध्ये सरशी साधत या स्पर्धेची विजयी सांगता केली.

आनंदने नॉर्वे स्पर्धेच्या पारंपरिक विभागातील नऊपैकी सहा लढती जिंकल्या, तर दोन लढतींमध्ये त्याला पराभव पत्करावा लागला. सहाव्या फेरीत अनिश गिरीविरुद्धची लढत अर्मागेडनमध्येही अनिर्णित राहिली, परंतु नियमानुसार काळ्या मोहऱ्यांनिशी खेळणाऱ्या आनंदला विजयी ठरवत अधिक अर्धा गुण कमावता आला. आनंदने नऊ फेऱ्यांमध्ये एकूण १४.५ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. कार्लसनने एकूण १६.५ गुणांसह अग्रस्थान पटकावताना ही स्पर्धा जिंकली.

## भारतीय संघासाठी विश्वचषक जिंकण्याचे ध्येय -हार्दिक पांड्या

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



नुकत्याच झालेल्या इंडियन प्रीमियर लीगचे जेतेपद आपला पहिलाच हंगाम खेळणाऱ्या गुजरात टायटन्स संघाने पटकावले. गुजरातच्या कर्णधारपदाची जबाबदारी भारतीय संघातील अष्टपैलू खेळाडू असलेल्या हार्दिक पांड्याकडे होती. पांड्याने संपूर्ण हंगामात अप्रतिम कामगिरी करीत संघाला विजेतेपद मिळवून दिले. त्याने बीसीसीआय टीव्हीसोबत बोलताना आपल्या भविष्यातील योजना आणि ध्येयांबाबत माहिती दिली.

हार्दिक पांड्या इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच चांगल्या फॉर्ममध्ये होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या पहिल्या टी-ट्वेंटी सामन्यातही त्याने आपला हाच फॉर्म कायम ठेवला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्यात पांड्याने १२ चेंडूंत ३१ धावा करून भारतीय संघाला २००धावांचा टप्पा पार करून दिला, मात्र आयपीएल विजेतेपद किंवा एखादी मालिका जिंकणे हे आपले ध्येय नसल्याचे त्याने म्हटले आहे.

पांड्या म्हणाला, भारतीय संघासाठी विश्वचषक जिंकणे हे आपले मुख्य आणि सर्वांत मोठे ध्येय आहे. देशासाठी खेळण्याची भावना नेहमीच माझ्यासाठी खास राहिली आहे. मी त्यासाठी सतत उत्सुक आहे. विश्वचषकाच्या तयारीसाठी सध्या सुरू असलेल्या मालिका महत्त्वाच्या आहेत. पुन्हा एकदा क्रिकेट पूर्ण जोमात सुरू झाले आहे. त्यामुळे सतत फॉर्ममध्ये राहणे गरजेचे आहे. कदाचित भविष्यात माझ्या भूमिका आणि जबाबदाऱ्याही बदलल्या जातील.

## श्रीलंकेचा ऑस्ट्रेलियावर थरारक विजय

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियादरम्यान तीन सामन्यांच्या टी-ट्वेंटी मालिकेतील शेवटचा सामना शनिवारी (दि. ११) खेळवण्यात आला. हा सामना यजमान लंकेने चार गडी राखून जिंकला. श्रीलंकेसाठी हा विजय ऐतिहासिक ठरला. कारण, त्यांनी शेवटच्या तीन षटकात ५९ धावा ठोकत लक्ष्य गाठले.

टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच एखाद्या संघाने शेवटच्या तीन षटकांत ५९ धावांचा यशस्वी पाठलाग केला आहे. लंकेच्या या विजयात कर्णधार दासुन शनाकाचा सिंहाचा वाटा आहे.


खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

## महाराष्ट्राने हरियाणाला टाकले मागे

**पंचकुला : वृत्तसंस्था**

टेनिस, टेबल टेनिस आणि जलतरण क्रीडा प्रकारात मिळवलेल्या तीन सुवर्ण, चार रौप्य आणि पाच कांस्यपदकांच्या बळावर महाराष्ट्राने शनिवारी खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत हरियाणाला मागे टाकले. महाराष्ट्राच्या खात्यावर ३७ सुवर्ण, ३३ रौप्य आणि २८ कांस्य अशी एकूण ९८ पदके जमा आहेत.

जलतरणात अपेक्षा फर्नांडिसने २०० मीटर मुलींच्या वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक मिळवताना २:२५.१८ सेकंदांचा नवा विक्रम नोंदवला. चार बाय १०० मीटर रीलेमध्ये भक्ती वाडकर, अपेक्षा फर्नांडिस, संजिती साहा, आन्या वाला यांनी रौप्यपदक



संपादन केले. याचप्रमाणे २०० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये पलक जोशीने २:२७.९६ सेकंदांसह रुपेरी पदक जिंकले.

टेबल टेनिसमध्ये मुलींच्या दुहेरीत दिया चितळे आणि स्वस्तिका घोष जोडीने हरियाणाच्या प्रिथोकी चक्रवर्ती आणि सुहाना सैनी यांना १४-१२, ११-०९, ११-६ असे हरवून सुवर्णपदक पटकावले. टेनिसमध्ये महाराष्ट्राच्या आकांक्षा निठुरेने कर्नाटकच्या सुहिता मयुरीचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. आकांक्षाने ६-७, ७-६, ६-४ अशा फरकाने सुहिताला हरवले. आकांक्षाने रूमा गायकैवारीसह दुहेरीत कांस्यपदकही मिळवले. मग महाराष्ट्राच्या वैष्णवी आडकरने (पुणे) एकेरीत कांस्यपदक पटकावले तसेच वैष्णवीने सुदिप्ता कुमारच्या साथीने महिला दुहेरीचे रौप्यपदक मिळवले. तमिळनाडूच्या लक्ष्मीप्रभा आणि जननी रमेश जोडीने त्यांना पराभूत केले. याचप्रमाणे सायकलिंगमध्ये मास स्टार्ट प्रकारात सिद्धेश पाटीलने रौप्यपदक पटकावले.

### खो-खोमध्ये दोन्ही संघ सेमीफायनलमध्ये

खो-खोमध्ये महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी उपांत्य फेरी गाठली. अखेरच्या साखळी सामन्यात मुलींच्या संघाने पंजाबवर १०-८ (१०-४) अशी एक डाव व दोन गुणांनी सहज मात केली, तर मुलांच्या संघाला विजयासाठी पश्चिम बंगालने १८-१५ (८-१०) असे चांगलेच झुंजवले. मुलींच्या संघातील अश्विनी शिंदे, कौशल्या पवार, प्रीती काळे आणि वर्षाली भोयेने अप्रतिम खेळ केला. मुलांच्या संघातर्फे रोहन कोरे, आकाश तोगरे, आदित्य कुडले आणि सुफियान शेखने महाराष्ट्राच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## अश्विन खेळतोय क्लब क्रिकेट

■ इंग्लंड दौऱ्यासाठी तयारी



**चेन्नई : प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेला दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा संपल्यानंतर भारतीय संघ इंग्लंच्या दौऱ्यावर जाणार आहे. त्या दौऱ्यात भारतीय संघ एक कसोटी सामना खेळणार आहे. या सामन्यासाठी भारतीय खेळाडू रविचंद्रन अश्विनने आतापासूनच जोरदार तयारी सुरू केली आहे. त्याने इंग्लंड दौऱ्याची तयारी म्हणून क्लब क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली आहे. एखाद्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात नावाजलेल्या भारतीय खेळाडूने पुन्हा क्लब क्रिकेट खेळण्याची कदाचित ही पहिलीच वेळ असावी.

इंडियन प्रीमियर लीगचा १५वा हंगाम काही दिवसांपूर्वीच संपला. त्यानंतर लगेचच दक्षिण आफ्रिकेचा संघ पाच टी-ट्वेंटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी भारतात दाखल झाला. या मालिकेतून काही वरिष्ठ भारतीय खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. यामध्ये विराट कोहली, रोहित शर्मा, अश्विन या खेळाडूंचा समावेश आहे. यापैकी विराट कोहली सध्या घरीच आपल्या कुटुंबाला वेळ देत आहे, तर रोहित शर्मा नुकताच मालदीव फिरून आला आहे. अश्विनने मात्र जरा हटके पर्याय निवडला. त्याने विश्रांतीसाठी मिळालेल्या वेळेत क्लब क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. इतकेच नाही तर त्याने एका क्लबचे कर्णधारपदही स्वीकारले.

अश्विनने पलायमपट्टी शिल्ड स्पर्धेत भाग घेत मैलापूर रिक्रिएशन क्लब ‘ए’चे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वात संघाने विजेतेपद मिळविले. उपांत्य फेरीत अश्विनने १०८ चेंडूंत ८१ धावांची खेळी केली.

> **आयपीएलच्या मूडमधून बाहेर पडण्यासाठी मी क्लब क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. वाढते वय आणि अनुभवानुसार तुम्ही अधिक चांगला खेळ करू शकता. मीदेखील तेच करण्याचा प्रयत्न करत आहे. मी सध्या खेळाचा आनंद घेत आहे आणि मला इंग्लंडमध्येही असेच करायचे आहे. मी तिथेही गोलंदाजी आणि फलंदाजीमध्ये योगदान देऊ शकतो.**
>
> **-आर. अश्विन**















हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**